www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १६४ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, १२ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



उल्हासनगरात भरारी पथकातील ५ जणांवर खंडणीचा गुन्हा दाखल

पान ३ वर....



न्यायाधीश संजीव खन्ना यांनी सरन्यायाधीश पदाची घेतली शपथ

पान ६ वर....

# "महायुतीचे सरकार हे देणारं आहे, घेणारं नाही"- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

● ठाणे, यश सावंत :

**मुख्यमंत्री असलो तरी एक सामान्य कार्यकर्ता म्हणून मी काम करत आलो आहे, घरात बसत सोशल मीडियाच्या माध्यमातून काम करण्याची माझी कार्यपद्धती नाही. जनतेत राहून त्याचे प्रश्न कसे सोडवले जातील, यासाठी मी प्रयत्नशील असतो. ज्या ज्या विकासकामांना निधीची गरज भासली त्या त्या वेळी तो निधी आम्ही दिला आहे.**

## मुख्यमंत्री सहायत्ता निधीतून ८० हजार जणांना मदत



महायुतीचे सरकार हे देणारं आहे, घेणारं नाही, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि.११) नाव न घेता उद्धव ठाकरेंना लगावला. ते जालना येथे प्रचारसभेत बोलत होते.


तसेच मुख्यमंत्री सहायत्ता निधीतून ८० हजार जणांना मदत केली असून सातत्यानं जनतेचं हित हेच माझं प्राध्यानं राहिलं आहे. जनतेची सेवा हेच माझं परम कर्तव्य आहे. महायुतीचं सरकार हे सर्वसामान्याचं सरकार असल्याचेही शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले. सर्वसामान्यांना अडीच वर्षात काय मिळालं याचा विचार करायला हवा. मंदिर बंद, सण बंद तुम भी घर मे बैठो हम भी घर मे बेठते है, असं त्या सरकारचं काम होतं. बाळासाहेब म्हणायचे कार्यकर्ता घरात नाही, लोकाच्या दरात शोभून दिसतो. म्हणून आम्ही शासन आपल्या दारी घेऊन गेलो. ५ कोटी लाभार्थ्यांना 'शासन आपल्या दारी' या योजनेतून पैसे मिळाले. या योजना पहिल्या होत्या. पण सरकारी काम सहा महिने थांब असं सरकार असल्याने माणूस कंटाळून सोडून देत होता, असेही शिंदे म्हणाले.

# "पिक वाढले की रोगही वाढतात, जे चांगले उत्पादन देतात.." - केंद्रीयमंत्री नितीन गडकरी

● मुंबई, विशाल कारंडे :

भाजपचा विस्तार झपाट्याने होत आहे. पीक वाढले की त्यासोबत रोगही वाढतात. भाजपकडे भरपूर पीक आहेत, जे चांगले उत्पादन देतात, परंतु काही रोग देखील आणतात. त्यामुळे अशा आजारी पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करावी लागते, असे बेधडक वक्तव्य पुन्हा एकदा केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या ११ दिवस आधी केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी बंडखोरांबाबत वक्तव्य केले आहे. गडकरींना एका मुलाखतीत बंडखोर भाजपमध्ये प्रवेश करण्याबाबत विचारण्यात आले होते. त्याला उत्तर देताना गडकरी पुढे म्हणाले, भाजपमध्ये नवीन लोक वेगवेगळ्या कारणांसाठी येत आहेत. त्यांना प्रशिक्षण देणे, विचारधारा सांगणे आणि त्यांना कार्यकर्ता बनवणे ही आपली जबाबदारी आहे.



हजार कार्यकर्ते उभे असतात, पण कधी कधी एक कार्यकर्ता काहीतरी बोलतो आणि त्या हजार कार्यकर्त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरते.

गडकरींना विचारण्यात आले की, लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील पराभवानंतर नड्डा आणि अमित शहा यांनी महाराष्ट्रातील भाजप नेत्यांच्या अनेक बैठका घेतल्या, परंतु ते या बैठकांना उपस्थित नव्हते. त्यावर गडकरी म्हणाले- महाराष्ट्रात माझी कोणतीही भूमिका नाही. येथील नेते सक्षम आहेत. जेव्हा त्यांना माझी गरज असेल तेव्हा मी उपलब्ध असेल.

गडकरी पुढे मुलाखतीत म्हणाले की, सरकार आणि प्रशासन धर्मनिरपेक्ष असले पाहिजे. एखादी व्यक्ती धर्मनिरपेक्ष असो वा नसो, पण राज्य, सरकार आणि प्रशासन हे धर्मनिरपेक्ष असले पाहिजे. काँग्रेसने ग्रामीण भारताच्या विकासाचा कधीच गांभीर्याने विचार केला नाही. ग्रामीण भारताला प्राधान्य दिले असते तर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नसत्या आणि खेड्यात गरिबी नसती. भारताच्या ७५ वर्षांच्या इतिहासात काँग्रेसने ग्रामीण भागाच्या विकासाकडे सातत्याने दुर्लक्ष केले आहे.

## भारतीय बनावटीचा रोबोट खरेदी करणारे ससून हे राज्यातील पहिले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय



● पुणे, अभिजित येरल्लू :

रोबोटिक तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रियांमध्ये अचूकता आली असून, वेळेची आणि खर्चाची बचत होत आहे. खासगी रुग्णालयांमध्ये रोबोटिक शस्त्रक्रियांचे प्रमाण वाढत आहे. आता ससून रुग्णालयाच्या सर्जरी विभागातही रोबोट दाखल होणार आहे. भारतीय बनावटीचा रोबोट खरेदी करणारे ससून हे राज्यातील पहिले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ठरले आहे. तंत्रज्ञानातील अचूकता, नेमकेपणा, वेळेची बचत, कमी वेदना यामुळे रोबोटिक शस्त्रक्रियांना अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. सध्या खासगी रुग्णालयांमध्ये प्रामुख्याने सांधे बदलांच्या शस्त्रक्रियेमध्ये रोबोचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. आता हर्निया, गॉल ब्लॅडर, पोटाच्या, गायनॅकॉलिजकल अशा शस्त्रक्रिया रोबोटिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केल्या जात आहेत. ससून रुग्णालयात गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात रोबोटिक आर्मच्या सहाय्याने पहिली शस्त्रक्रिया प्रायोगिक तत्त्वावर पार पडली. आता रोबोटिक शस्त्रक्रियांमध्ये ससूनने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.

■ सध्या रोबोटिक सर्जरीबाबत देशात विविध प्रयोग केले जात आहेत. मात्र, रोबोटिक सर्जरी अतिशय महाग असते. विशेषत: खासगी रुग्णालयांमध्ये रोबोटिक सर्जरीसाठी लाखो रुपयांचा खर्च होतो. गरीब रुग्णांना एवढा खर्च करणे शक्य नसते. त्यामुळे ससून रुग्णालयातील रोबोटिक शस्त्रक्रिया रुग्णांसाठी वरदान ठरणार आहे.

# खासदार धनंजय महाडिकांना केंद्रीय निवडणूक आयोगाची नोटीस

● कोल्हापूर, विशाल पाटील :



भाजपचे राज्यसभा खासदार धनंजय महाडिक त्यांच्या वक्तव्यांमुळे अडचणीत आले आहेत. महाडिकांना केंद्रीय निवडणूक आयोगाने नोटीस पाठवली आहे. दोन दिवसांपूर्वी एका जाहीर सभेत बोलताना महाडिकांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिला महाविकास आघाडीच्या रॅलीत दिसल्या तर त्यांचे फोटो काढा आणि त्यांची नावे मला पाठवा आपण त्यांना धडा शिकवू, असे विधान केले होते. त्यानंतर धनंजय महाडीक यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

खासदार धनंजय महाडीक यांनी केलेल्या वादग्रस्त विधानाबाबत निवडणूक आयोगाकडे खुलासा केला होता. मात्र निवडणूक आयोगाने त्यांचा खुलासा मान्य केला नाही. त्यानंतर आता खासदार धनंजय महाडीक यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. त्यांचीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोल्हापूरच्या सभेत महाडीक यांनी लाडकी बहिणीविरोधात वादग्रस्त विधान केल्याबद्दल महाविकास आघाडीतील नेत्यांनी त्यांच्याविरोधात आयोगाकडे तक्रार केली होती.

"लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महीला महाविकास आघाडीच्या मेळाव्यात दिसल्याच त्याचा फोटो काढून व्हिडीओ बनवा, नंतर त्यांची नावे मला पाठवा, मग मी त्या महिलांना धडा शिकवेन," असे वादग्रस्त वक्तव्य धनंजय महाडिक यांनी केले होते. पान २ वर

## मुंबईतील शिवाजीपार्क येथे १४ नोव्हेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदींची होणार भव्य सभा

● मुंबई, राकेश गायकवाड :



महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा प्रचार जोरदार सुरू आहे. राजकीय पक्ष सभा आणि रोड शो जोरदार करत मतदाराला आपल्या बाजूने खेचण्याचा प्रयत्न करत आहेत. भारतीय जनता पक्षाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची १४ नोव्हेंबरला महाराष्ट्रात तीन सभांचे आयोजन केले आहे.

पीएम मोदींची सभा मुंबईतील शिवाजी पार्क येथे आयोजित केली आहे. शिवाजी पार्क येथे बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक असल्याने या सभेला विशेष महत्त्व आहे, तर दुसरी सभा नवी मुंबई आणि तिसरी सभा छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केली आहे. पंतप्रधान महायुतीचा प्रचार करत कोकण आणि मराठवाडा भागातील लोकांशी संवाद साधणार आहेत. विशेष म्हणजे पंतप्रधान बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकावर जाऊन अभिवादन करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिवाजी पार्कमधील पंतप्रधान यांच्या सभेची जय्यत तयारी भाजप-प्रणीत महायुतीने सुरू केली आहे. पान २ वर

# कोणताही धर्म प्रदूषणाला प्रोत्साहन देत नाही; फटाका बंदीबाबत सर्वोच्च न्यायालयाची टीप्पणी

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



दिल्ली-एनसीआरमधील खराब वातावरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. कोणताही धर्म वाढत्या प्रदूषणाला प्रोत्साहन देत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने यावेळी म्हटले आहे. फटाके जाळले तर शुद्ध हवा मिळत नाही, जे कलम २१ चे, म्हणजेच जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन आहे, अशी टिप्पणीदेखील न्यायालयाने सुनावणीदरम्यान केली. न्यायालयाने दिल्ली पोलिस आयुक्तांना वैयक्तिक शपथपत्र दाखल करण्याचे निर्देश दिले असून, फटाक्यांवर बंदी लागू करण्यासाठी त्यांनी काय पावले उचलली, याची नोंद ठेवण्यास सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, आम्ही दिल्ली पोलिस आयुक्तांना फटाक्यांवर बंदीची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी विशेष सेल तयार करण्याचे निर्देश देतो. आम्हाला आश्चर्य वाटते की, दिल्ली सरकारने १४ ऑक्टोबरपर्यंत बंदी लादण्यास उशीर का केला? त्यापूर्वीच ग्राहकांना फटाक्यांचा साठा मिळाला असण्याची शक्यता आहे. कलम २१ अन्वये प्रदूषणमुक्त वातावरणात जगण्याचा अधिकार आहे. प्रथमदर्शनी आमचा असा विश्वास आहे की, कोणताही धर्म प्रदूषणाला प्रोत्साहन देणाऱ्या किंवा लोकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या कोणत्याही कृतीला प्रोत्साहन देत नाही. पान २ वर

## महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून देवळाली कॅम्प येथे १२ हजार तरुण सैन्य भरतीसाठी उपस्थित



● नाशिक, सचिन कदम :

देवळाली कॅम्प येथे टीए बटालियन यांच्या वतीने सैन्य भरती प्रक्रिया सुरु असून सोमवारी राज्यातील अहमदनगर, अकोला, छत्रपती संभाजी नगर, धुळे, जळगाव, कोल्हापूर, नंदुरबार, सोलापूर, सांगली आणि सातारा येथील सुमारे १२ हजारांहून अधिक तरुणांना संधी देण्यात आली. पान २ वर

# घोडबंदर किल्ल्यावरील झेंडा काढा मगच जतनाच्या परवानगीचा विचार...

● ठाणे, प्रथमेश चव्हाण:

मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ल्याच्या संवर्धनाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याच्या जतनासाठी मात्र राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने पालिकेला मुदतवाढ देण्यास टाळाटाळ केली आहे. आधी या किल्ल्यावर बसविण्यात आलेल्या १०० फुटी झेंडा काढून टाकण्याचे निर्देश पालिकेला देण्यात आले असून मगच किल्ल्याच्या जतनाच्या परवानगीचा विचार करू, असा पावित्रा संचालनालयाकडून घेण्यात आला आहे.



शहरातील ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्याचे संवर्धन तसेच सुशोभीकरणाचे लोकार्पण ३० सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी किल्ल्याच्या संवर्धनासह सुशोभिकरणासाठी राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचलनालयाकडून महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक योजनेंतर्गत पालिकेला १८ जुलै २०१९ रोजी परवानगी देण्यात आली. २१ जुन २०१९ रोजीच्या करारनाम्यातील अटी शर्तीनुसार घोडबंदर किल्ल्याच्या संवर्धनासह त्यातील सुशोभीकरणाला पुरातत्व विभागाकडून पालिकेला ५ वर्षांची मुदत देण्यात आली होती. ती मुदत २४ जून रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे किल्ल्याचे जतन करण्यासाठी पालिकेला १० वर्षांची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी पालिकेकडून संचालनालयाकडे करण्यात आली आहे. त्यासाठी पालिकेकडून संचालनालयाकडे सतत पत्रव्यवहार करण्यात येत आहे. तत्पूर्वी या किल्ल्याच्या बुरुजावर १०० फुटी भगवा झेंडा किल्ल्याच्या बसविण्यात आला आहे. त्यासाठी संचालनालयाची परवानगी घेणे आवश्यक असताना ती घेण्यात आली नसल्याने त्यावर संचालनालयाकडून आक्षेप घेण्यात आला आहे.

दरम्यान किल्ल्याच्या संवर्धनाचे काम पूर्ण झाल्याने त्यातील सुशोभीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. मात्र पालिकेला देण्यात आलेली मुदत संपुष्टात आल्याने संचालनालयाकडून मुदतवाढ मिळणे पालिकेसाठी आवश्यक ठरले आहे. त्यासाठी पालिकेने संचालनालयाकडे सतत पत्रव्यवहार केला असून संचालनालयाने मात्र किल्ल्यावर बसविण्यात आलेला झेंडा आधी काढून टाकण्याचे निर्देश पालिकेला दिले आहेत. त्यानंतर पालिकेकडून प्रस्तावित असलेल्या सुशोभीकरणाच्या कामाचा विचार करण्याबाबत संचालनालयाने स्पष्ट केले आहे. त्यातच किल्ल्याचे संवर्धन झाल्याने किल्ल्याचे जतन करणे, त्याचे नियमित संचलन करण्यास १० वर्षांची मुदतवाढ देण्याची मागणी पालिकेने केली आहे. मात्र त्यासाठी संचालनालयाकडून ठोस कार्यवाही केली जात नसल्याचे समोर आले आहे.

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# भारताचे गस्ती स्वातंत्र्य चीनने केले मान्य

भारत-चीन सीमेवरील घडामोडी दिवाळीच्या उत्साहात भर घालणाऱ्या आहेत. गेली साडेचार वर्षे या भागांमध्ये केवळ शिव्या-बुक्क्यांची आणि काही वेळेस तर तीक्ष्ण शस्त्रांच्या प्रहारांची देवाण-घेवाण होत होती. त्याच्या आधी कित्येक वर्षे संशयाच्या आणि तिरस्काराच्या नजरा परस्परांवर फेकल्या जात. या कडवट आणि हिंसक पार्श्वभूमीवर दोन कट्टर शत्रूंमधील बदलते वर्तमान सुखसमाधान प्रसवणारे. एका हिंसक, रक्तलांछित आणि संशयपूर्ण पर्वानंतर बऱ्याच प्रमाणात परस्पर विश्वासातून या विशाल सीमेवर काही स्थैर्यगर्भ, सकारात्मक घडून येत आहे; याबद्दल दोन्ही बाजूंना वाटणारे समाधान स्पष्ट दिसत आहे. या दिलासादायी वाटचालीचे श्रेय अर्थातच दोन्ही देशांच्या सरकारांचे, त्यांच्या मुत्सद्द्यांचे आणि लष्करी कमांडरांचेही. मतैक्याअभावी इकडे महाराष्ट्रात राजकीय लाथाळ्या सुरू असताना, तिकडे दोन देशांदरम्यान टोकाच्या मतभेदाच्या मुद्द्यांवर वरकरणी अशक्यप्राय वाटणारी दिलजमाई घडून येते, ही जाणीव गुलाबी थंडीवत सुखद चाहूल देणारीच. पूर्व लडाख सीमेवर उत्तर टोकाकडील देप्सांग आणि दक्षिण टोकाकडील देम्चोक या भागांमध्ये गस्तीस गुरुवारपासून सुरुवात होत आहे. त्यासाठी आवश्यक सैन्यमाघारीचे सोपस्कार चीनकडून पूर्ण झाले आहेत. दोन देशांदरम्यान झालेल्या वाटाघाटींनुसार आता भारतीय सैनिकांना या दोन ठिकाणी २०२० पूर्वस्थितीनुसार निर्धारित बिंदूंपर्यंत गस्त घालता येईल. गस्त महिन्यातून किती वेळा असावी आणि गस्तपथकात किती सैनिक असावेत याविषयीच्या अटीशर्ती निश्चित झाल्या आहेत. अलीकडे २१ ऑक्टोबर रोजी भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी यासंबंधी प्रथम घोषणा केली होती. दुसऱ्या दिवशी रशियातील कझान येथे 'ब्रिक्स' शिखर परिषदेनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यात चर्चा झाली. आणखी तीन दिवसांनी चीननेही गस्तबिंदूंबाबत सहमती झाल्याचे जाहीर केले. त्यावर गेल्या दोन दिवसांत अंमलबजावणी सुरू झाली ही नक्कीच आश्वासक बाब. गलवान खोऱ्यात झालेली धुमश्चक्री आणि त्यास प्राधान्याने कारणीभूत ठरलेली चीनची अनेक टापूंमध्ये झालेली घुसखोरी ही भारत-चीन संबंध काही काळ विस्कटून टाकण्यास कारणीभूत ठरली होती. त्याही वेळी चीनसमोर वाटाघाटी सुरू झाल्या. मात्र त्या वेळी देप्सांग आणि देम्चोक येथे ठिय्या मांडून भारतीय सैनिकांना रोखणाऱ्या चिनी तुकड्या माघारी घेण्याविषयी चीनकडून वाच्यता होत नव्हती. दरम्यानच्या काळात गलवान खोरे, पँगाँग सरोवर, तसेच गोग्रा-हॉट स्प्रिंग्ज या ठिकाणी वाटाघाटीपश्चात सैन्यमाघारी झालेली आहे. पण सैन्यमाघारीनंतर तेथे नवी बफर क्षेत्रे आखण्यात आली आहेत. त्याचे मुख्य उद्दिष्ट भारत व चीनच्या सैनिकांमध्ये गस्तबिंदूंवरून पुन्हा चकमक उडू नये, हे आहे. त्या तुलनेत देम्चोक आणि देप्सांग येथे अशी काही नवी बफर क्षेत्रे निर्माण करण्याची अट चीनने घातलेली नाही, हे लक्षणीय ठरते.

याविषयी २२ ऑक्टोबर रोजी 'लोकसत्ता'ने 'सहमतीतील अर्थमती' या संपादकीयातून भाष्य करताना, चीनच्या बदललेल्या भूमिकेमागील आर्थिक कंगोरे उलगडून दाखवले होते. गलवानपश्चात भारताने 'टिकटॉक'सारख्या अनेक चिनी उपयोजनांवर बंदी आणली. काही चिनी तंत्रज्ञान कंपन्यांच्या कार्यालयांवर सरकारी तपासयंत्रणांनी छापेही घातले. चीनकडून झालेल्या हिंसक घुसखोरीबद्दलची ती स्वाभाविक प्रतिक्रिया असली, तरी बरीचशी प्रतीकात्मक होती. चीनला धडा शिकवायचा, तर चिनी मालाची भारतात होणारी आयात कमी करणे गरजेचे होते. यंत्रसामग्रीबाबत चीनवर असलेले अवलंबित्व कमी करणे अपेक्षित होते. हे घडू शकले नाही. कदाचित त्याच काळात आलेल्या करोना महासाथीमुळे भारताचे आर्थिक नियोजन बिघडले. साथनियंत्रण, अन्नपुरवठा, रोजगारनिर्मिती, आर्थिक मदत अशा महत्त्वाच्या आघाड्यांवर सरकारला लढावे लागले. त्यामुळे घडले असे, की चीनकडून भारतात होणारी आयात फुगतच गेली. एका अहवालानुसार, चीनकडून होणारी आयात नि त्या देशात आपल्याकडून जाणारी निर्यात यांतील तफावत किंवा व्यापारी तूट गेल्या पाच वर्षांत प्रचंड फुगली आहे. गेल्या आर्थिक वर्षात चीनकडून भारतात १०१.७४ अब्ज डॉलरची (अंदाजे साडेआठ हजार अब्ज रुपये) आयात झाली. त्या तुलनेत भारताची त्या देशातील निर्यात होती १६.६५ अब्ज डॉलर (अंदाजे १३९६ अब्ज रु.). सन २०२०च्या आर्थिक वर्षात चीनकडून भारतात ६५.२६ अब्ज डॉलरची (अंदाजे ५४८७ अब्ज रु.) आयात नोंदवली गेली होती. म्हणजे आपल्याकडील चिनी आयातीत गेल्या पाचेक वर्षांमध्ये सुमारे ५५ टक्के वाढ झाली.

यातून दोन बाबी स्पष्ट होतात. चीनला आव्हान देता येईल इतक्या प्रमाणात भारताला आपले उत्पादन आणि सेवा क्षेत्रही वाढवता आलेले नाही. याविषयी वेळोवेळी 'लोकसत्ता'ने भाष्य केलेलेच आहे. परंतु त्याच वेळी, भारतासारख्या 'शत्रू' देशाशी व्यापाराच्या बाबतीत चीनने स्वार्थापोटी का होईना, पण हात आखडता घेतलेला नाही हे उघड आहे. गेली दोन वर्षे चीनची भाषा बदलली म्हणजे नेमके काय झाले, तर त्या देशाचे उच्चपदस्थ भारताबरोबर 'विवादास्पद मुद्दे जरा बाजूला ठेवून' आर्थिक संबंध दृढ करूया असे म्हणू लागले आहेत. यावर भारताने नेहमीच, सीमेवर सौहार्द असल्याशिवाय इतर क्षेत्रांत मैत्रीवृद्धी असंभव अशी भूमिका घेतली. हीच आपली भूमिका पाकिस्तानशी संबंधांसंदर्भातही मांडली जाते. तिची चिकित्सा होऊ शकते, पण यात सातत्य आहे हे मात्र नक्की. आर्थिक आघाडीवर चीनला अमेरिका, युरोपीय समुदाय आणि जपान-कोरिया यांच्याकडून सातत्याने आव्हान मिळते. त्या देशाच्या अनेक क्षेत्रांमध्ये अनेक वर्षे दिसून आलेली भरती आता ओसरू लागलेली आहे. पैशाचे सोंग त्या देशालाही आणता येत नाही. आपला चीनशी उभा दावा सामरिक मुद्द्यांवर आहे, पण आर्थिक आघाडीवर आपण त्या देशाला अडचणीत आणत नाही. शिवाय, अपारंपरिक ऊर्जा तंत्रज्ञान क्षेत्रात चीनची मक्तेदारी वादातीत आहे. त्या विश्वात भारताने अत्यंत महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे निर्धारित केली आहेत. ती साधण्यासाठी योग्य भागीदार म्हणजे चीनच असू शकतो, हे चीनने ताडले आहे नि भारताने स्वीकारले आहे! बडा पुरवठादार आणि बडी बाजारपेठ यांच्यातील हा असा आर्थिक समझोता आहे. त्यामुळेच एरवी ज्या बिंदूंविषयी चीनने विषयही काढणे टाळले, तेथे भारताचे गस्ती स्वातंत्र्य चीनने मान्य केले आहे. अर्थातच इतर वादग्रस्त भूभागांमध्ये 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याची चलाखीही चीन दाखवत आहे. परिस्थिती 'जैसे थे' ठेवणे हे आपल्यासाठी नामुष्कीजनक. ती पूर्ववत करण्याविषयीच आपण आग्रही असले पाहिजे, असे मानणारा मोठा वर्ग आहे. त्यांचे म्हणणे तथ्याधारित खरेच. परंतु चीनसारख्या चलाख आणि ताकदीच्या प्रतिस्पर्ध्यापुढे वादाच्या सर्वच मुद्द्यांची उकल शक्य नाही, याचे भान असणेही आवश्यक. तसेच निव्वळ गस्तीस जमीन मोकळी केली याचा अर्थ ती सैन्यमाघारी ठरत नाही. चीनचे सैन्य अनेक ठिकाणी बफर क्षेत्राच्या आत 'सरकले' आहे. हे सीमोल्लंघन हेरण्यात भारताने विलंब केला हे नाकारता येत नाही. तरीदेखील मोठी आणि विस्तारणारी बाजारपेठ म्हणून आपली दखल जगाला घ्यावी लागते आणि तशी ती चीनलाही घ्यावी लागली, हे महत्त्वाचे. आर्थिक अपरिहार्यता किंवा आर्थिक समीकरणांपुढे राजकीय आणि सामरिक वैरभाव अनेकदा गौण ठरतो हे इतिहासात अनेकदा दिसून आले आहे.

# पक्षांचा लळा, पर्यावरणवादी डॉ. सलीम



सलीम अलींचा 12 नोव्हेंबर हा जन्मदिवस पक्षी दिन म्हणून जाहीर करण्याचे महाराष्ट्र सरकारने ठरवले होते. डॉ. सलीम अली हे भारतातील आद्य पक्षीशास्त्रज्ञ आणि पर्यावरणवादी होते. सलीम अली यांनी भारतातील ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतातील पक्ष्यांचा आढळ, त्यांच्या सवयी, पक्ष्यांच्या विविध जाती आणि जातींमधील वैविध्य यांचा बारकाईने अभ्यास केला. त्यांच्या ह्या कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा चालू झाली. भारतातील हे पक्षी निरीक्षक सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांना 'बर्डमॅन ऑफ इंडिया' असे ही संबोधले जाते.

डॉ. सलीम अली आपण पक्षी निरीक्षणाकडे कसे वळलो याचे वर्णन आपल्या आत्मचरित्रात करतात. मुंबईच्या खेतवाडीमध्ये मुस्लिम कुटुंबात अली यांचा जन्म झाला. लहानपणी भेटवस्तू म्हणून दिलेल्या छर्‍याच्या बंदुकीने लहान पक्षी टिपायचे हा त्यांचा छंद होता. एके दिवशी टिपलेल्या चिमण्यांमध्ये त्यांना वेगळी चिमणी मिळाली. हिच्या गळ्यापाशी पिवळा ठिपका होता. नेहेमीपेक्षा हा पक्षी वेगळा दिसल्याने त्यांची उत्सुकता चाळवली व त्यांनी त्यांच्या मामांकडे हा पक्षी कोणता याची विचारणा केली. मामा त्याला थेट बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या संचालकांकडे घेऊन गेले. तेथे संचालकांनी छोट्या अलीला हा पक्षी कोणता हे सविस्तर सांगितले, तसेच भुसा भरलेल्या पक्ष्यांचा संग्रह दाखवला. भारावललेल्या सलीम अलींना पक्ष्यांची जी भुरळ पडली ती कायमचीच.

यानंतरच्या काळात सलीम अलींचा पक्षीछंद त्यांना टिपणे व नोंदी करणे यांपुरता मर्यादित राहिला. शालेय शिक्षणानंतर त्यांना प्राणी शास्त्रात पदवी घ्यायची होती परंतु शास्त्रातील अनेक अवघड विषयांमुळे माघार घ्यावी लागली. दरम्यान ते ब्रम्हदेशातील आपल्या बंधूंच्या धंद्याला मदत म्हणून रंगूनला गेले. तेथे धंद्यात मदतीसोबत त्यांनी ब्रम्हदेशातील जंगले फिरून पक्ष्यांना टिपून त्यांच्या नोंदी ठेवायचा छंद चालू ठेवला. 1918 मध्ये त्यांचा तेहमिना यांच्यांशी विवाह झाला. एका यशस्वी पुरुषामागे पत्नीचा हात असतो ही म्हण सलीम अलींच्या बाबतीत तंतोतंत लागू होते. 1924 मध्ये रंगून मधील धंद्यात अपयश आल्यानंतर अली भारतात परत आले. दरम्यान तेहमिना यांनी सलीम अलींचा पक्ष्यांबद्दलचा कल जाणून घेतला होता व ज्यात त्यांचा छंद जोपासला जाईल अशी नोकरी करण्यास त्यांना प्रोत्साहन दिले. परंतु सलीम अलींचे शिक्षण अशी नोकरी मिळवण्यास एकदम जुजबी होते. जवळच्या ओळखीने त्यांना बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी मध्ये गाईड लेक्चररची नोकरी मिळाली, परंतु अलींना ते पुरेसे नव्हते. त्यावेळेस भारतात पक्षीशास्त्र हा विषय अस्तित्वातच नव्हता. यासाठी त्यांनी जर्मनीमध्ये जाऊन पक्षीशास्त्राचे प्रशिक्षण घेतले व काही काळ इंग्लंडमध्ये काम केले.

भारतात आल्यानंतर या विषयात नोकरी मिळणे कठीण काम होते. सलीम अली अजूनही हौशी पक्षी निरीक्षकांसारखेच गणले जात. आर्थिक परिस्थिती खालावल्याने त्यांनी आपल्या पत्नीच्या मदतीने अलिबागजवळ किहीमजवळ आपला मुक्काम हलवला. या मुक्कामात त्यांनी सुगरण पक्ष्याच्या वर्तनावर अतिशय बारकाईने अभ्यास केला व त्यावर 'बीएनएच्एस'च्या जर्नलमध्ये त्यांनी प्रदीर्घ शोधनिबंध लिहिला. हा निबध त्यांना पक्षीशास्त्रज्ञ म्हणून नावलौकिक मिळवून देण्यास जबाबदार ठरला. त्यांनी पक्ष्यांना केवळ टिपून त्यात भुसा भरून संग्रहालयात ठेवण्यासाठी पक्षिशास्त्र नाही हे जगाला दाखवून दिले व एकूणच पक्षीशास्त्रालाच वेगळी दिशा दिली.

यानंतर 1930 च्या सुरुवातीला सलीम अलींना ब्रिटिश सरकारपुरस्कृत तसेच संस्थाने पुरस्कृत पक्षी मोहिमांवर बोलवणे येऊ लागली. अलींनी या मोहिमांवर आपण नोंदी तसेच पक्ष्यांचा जीवनशैलींवर अभ्यास करणार असल्याचे स्पष्ट केले, केवळ पक्षी टिपून नोंदी ठेवण्यात आपल्याला रस नाही, ते काम कोणीही स्थानिक कामगार करू शकेल असे स्पष्ट केले. आता सलीम



प्रविण बागडे
नागपूर

अली सर्वमान्य पक्षी शास्त्रज्ञ झाल्यामुळे तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मंजूरी दिली व सलीम अलींचे पक्ष्यांचे खरेखुरे काम सुरू झाले. या नंतरच्या काळात भारताच्या मोठ्या भूभागावर त्यांनी पक्षी निरीक्षण मोहिमा आखल्या. देशाच्या वायव्य सरहद्दीपासून ते केरळच्या जंगलांपर्यंत तसेच कच्छच्या दलदलीपासून पूर्वेकडे सिक्कीम व अरुणाचलपर्यंत जाऊन त्यांनी पक्ष्यांच्या नोंदी केल्या. पक्ष्यांचे वर्तन, त्याच्यांत हवामानानुसार होणारे बदल, स्थलांतराच्या सवयी, विणीचे हंगाम यावर मोठ्या प्रमाणावर माहिती गोळा केली. सुरुवातीला या कामी त्यांची पत्नी तेहमिनाने खूप मदत केली. त्याच सलीम अलींच्या मोहिमांचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट बघत. 1939 मध्ये तेहमिनांचा मृत्यू झाल्यानंतर अली खूपच व्यथित झाले. त्यांच्या आयुष्यात खूप मोठी पोकळी निर्माण झाली. परंतु त्यातून सावरून पुन्हा लग्न न करता त्यांनी आपले आयुष्य पूर्णपणे पक्ष्यांना वाहून देण्याचे ठरवले. आपला मुक्काम मुंबईला बहिणीच्या घरी हलवला व तेथूनच आपले उर्वरित आयुष्य घालवून भारतीय पक्षीशास्त्रासाठी अजरामर ठेवा निर्माण केला.

सलीम अलींचे पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मोठेपण कशात आहे तर त्यांनी प्रकाशित केलेली पुस्तके. भारतभर फिरून त्यांनी जी तपशीलवार माहिती गोळा केली होती, त्याचे त्यांनी केवळ रेकॉर्ड्समध्ये स्थान न ठेवता ती माहिती सर्वसामान्यांना वापरता येईल अश्या शैलीत पुस्तके लिहिली. सुरुवातीच्या काळात त्यांचे लिखाण सुधारण्यातही त्यांना तेहमिनांनी मदत केली होती. 1943 मध्ये लिहिलेले द बुक ऑफ इंडियन बर्ड्स हे पुस्तक आजही पक्षी ओळखण्यासाठी पहिल्या पसंतीचे आहे आज हे पुस्तक 13 व्या आवृतीत असून पुस्तकातील पक्ष्यांची फारच थोडी चित्रे बदलण्यात आली आहेत. यावरून त्यांनी केलेल्या सूक्ष्म निरीक्षणांची अचूकता लक्षात येते. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ बर्ड्स ऑफ इंडिया अँड पाकिस्तान (पिक्टोरियल गाईड) या दहा खंडी पुस्तकाने त्यांना खऱ्या अर्थाने अजरामर केले. डॉ. सिडने डिलन रिप्ली यांच्या साथीदारीत त्यांनी अपार परिश्रम घेऊन भारतीय पक्ष्यांच्या 1200 जातींच्या व 2100 उपजातींच्या नोंदी, त्यांच्या सवयी वगैरे सर्वांगीण शास्त्रशुद्ध माहिती चित्रांसहित एकाच ठिकाणी उपलब्ध केली.

1950 व 60 च्या दशकात जेव्हा भारतात पर्यावरण हा शब्द अस्तित्वातच नव्हता त्यावेळेस भरतपूरच्या केवलदेव घाना राष्ट्रीय उद्यान तसेच केरळमधील सायलंट व्हॅली राष्ट्रीय उद्यानात तत्कालिन होणारे पर्यावरणास हानीकारक प्रकल्पांना विरोध दर्शावला. त्यांचे वाक्य तत्कालीन पंतप्रधान चरणसिंग यांना चांगलेच झोंबले होते. "ताजमहाल नष्ट झाला तर पुन्हा बांधता येईल परंतु सायलंट व्हली सारखे जंगल एकदा नष्ट झाल्यावर पुन्हा उभारता येणार नाही". त्यांनी केलेल्या शास्त्रीय वादावर सरकारने नमते घेउन इंदिरा गांधी सरकारने हे प्रकल्प स्थगित केले तसेच अंततः त्यांना राष्ट्रीय उद्यानांचा दर्जा देउन कायमचे संरक्षित केले. तसेच अनेक दुर्मिळ प्राणी व पक्षी यांबाबत आपल्या पुस्तकांद्वारे, संस्थेद्वारे, शिष्यांमार्फत केलेले सरकार तसेच सामान्य नागरिकांमध्ये केलेले प्रबोधन भारतातील पर्यावरण चळवळीचा पाया ठरले. त्यामुळेच भारतातील आद्य पर्यावरणवाद्यांमध्ये डॉ. सलीम अली यांचा समावेश होतो. आज त्यांच्या जन्मदिनानिमित्त सर्वांना राष्ट्रीय पक्षी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

# नरेंद्र मेहता यांच्या विरोधात आक्षेपार्ह मजकूर, कार्यकर्त्यावर गुन्हा दाखल झाल्याने जैन यांचे ठिय्या आंदोलन

**भाईंदर (धनश्री सट्टा)** - माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या विरोधात आक्षेपार्ह मजकूर समाजमाध्यमावर प्रसारीत केल्याप्रकरणी आमदार गीता जैन यांच्या छायाचित्रकारावर नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला सोमवारी ताब्यात घेण्यात आले. मात्र पोलिसांनी सूडबुद्धीने आणि बेकायदेशीरपणे कारवाई केल्याचा आरोप करत जैन यांनी पोलीस ठाण्यातच ठिय्या आंदोलन केले.



आमदार गीता जैन यांच्याकडे छायाचित्रकार म्हणून काम करत असलेल्या हर्ष शाह नावाच्या तरुणाने 'माय मिरा भाईंदर' या फेसबुक पेजवर भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या संदर्भात आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध केला होता. याबाबत नरेंद्र मेहता यांनी तक्रार दिल्यानंतर हर्षवर माहिती तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सोमवारी नवघर पोलिसांनी हर्ष शाह याला चौकशीसाठी घरातून ताब्यात घेतले. मात्र ही कारवाई सुडबुद्धीची असून पोलिसांनी बेकायदेशीररित्या हर्ष याला ताब्यात घेतल्याचा आरोप आमदार गीता जैन यांनी केला आहे. या कारवाईच्या निषेधार्थ सोमवारी दुपारी गीता जैन यांनी नवघर पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. आपल्या कर्मचारी व कार्यकर्त्यांना सातत्याने खोट्या गुन्हात अडकवण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत, असा आरोप जैन यांनी केला.

हर्ष शाह याच्यावर माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यावरून चौकशी करण्यासाठी त्याला नियमानुसार ताब्यात घेण्यात आले होते, असे पोलीस उपायुक्त (परिमंडळ १) प्रकाश गायकवाड यांनी सांगितले.

## पान १ वरून...



### खासदार धनंजय महाडिकांना केंद्रीय...



महाडिकांच्या या वक्तव्यानंतर महाविकास आघाडीनेही त्यांना घेरण्याचा प्रयत्न करत त्यांच्यावर टीका केली. खासदार धनंजय महाडिक हे खुल्या व्यासपीठावरून महिलांना गुंडांप्रमाणे धमकावले जात आहे. भाजपची खरी रणनीती, चारित्र्य आणि चेहरा याचाच हा पुरावा आहे. भाजप केवळ महिलांचा सन्मान करण्याचे नाटक करत आहे. महिलांना धडा शिकवणाऱ्यांना महाराष्ट्रातील जनता चोख प्रत्युत्तर देईल. अशा शब्दांत काँग्रेसने धनंजय महाडिकांना प्रत्युत्तर दिले. विरोधकांनी घेरल्यानंतर महाडिकांनी त्यांच्या या वक्तव्यावर स्पष्टीकरणही दिले. महाडिक म्हणाले, लाडकी बहीण योजना महाराष्ट्रात खूप लोकप्रिय आहे. 2 कोटी 30 लाख महिलांना त्याचा लाभ झाला आहे. माझे म्हणणे असे होते की जर काही महिला काँग्रेससोबत जात असतील तर त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यांना लाभ मिळावा म्हणून त्यांची नावे आणि छायाचित्रे काढावीत अशी आमची इच्छा आहे. पण काँग्रेसने ते चुकीच्या पद्धतीने घेतले आणि त्याचा अपप्रचार करत आहे.

कोल्हापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील भाजप-महायुतीचे उमेदवार अमल महाडिक यांच्या समर्थनार्थ प्रचारासाठी फुलेवाडी येथे झालेल्या जाहीर सभेत खासदार धनंजय महाडिक सहभागी झाले होते. यावेळी ते म्हणाले की, राज्यातील महायुतीच्या सरकारने सर्वसामान्य नागरिकांसाठी अनेक महत्त्वाच्या योजना राबविल्या आहेत. मात्र महाविकास आघाडीचे नेते या योजनांबाबत जनतेमध्ये गैरसमज पसरवत आहेत. या अफवांना सर्वसामान्य जनता विसरणार नाही.

खासदार महाडिक म्हणाले की, जाणाऱ्या आमदाराने गेल्या पाच वर्षांत कोणतेही ठोस काम केले नाही. काँग्रेस आमदाराने खोटी आश्वासने देऊन जनतेची दिशाभूल केली आहे. त्यामुळे बदलाची हीच वेळ आहे. त्यामुळे भाजप खासदार अमल महाडिक यांना जास्तीत जास्त मतांनी विजयी करून महायुतीचे सरकार स्थापन करा, असे आवाहनही यावेळी महाडिकांनी केले.



### कोणताही धर्म प्रदूषणाला प्रोत्साहन देत नाही...



सुनावणी सुरू करताना सर्वोच्च न्यायालयाने विचारले की, दिल्ली पोलिस आणि दिल्ली सरकारच्या वतीने न्यायालयात कोण हजर होते? फटाक्यांवर बंदी घालण्याचे आदेश आणि या बंदीच्या अंमलबजावणीसाठी कोणती पावले उचलली, हे आम्हाला दाखवा. दिल्ली सरकारच्या वकिलाने फटाक्यांवर बंदी असलेला आदेश दाखवला. यावर न्यायमूर्ती ओका म्हणाले, तुमच्या प्रतिज्ञापत्रात असे म्हटले आहे की, तुम्ही फटाक्यांवर फक्त दिवाळीत बंदी घालाल, पण लग्न आणि निवडणूक कार्यक्रमात बंदी असणार नाही.

यावर दिल्ली सरकारच्या वकिलांनी सांगितले की, कायमस्वरुपी बंदीच्या तुमच्या सूचना सर्व संबंधितांशी चर्चा केल्यानंतर विचारात घेतल्या जातील. ज्येष्ठ विधिज्ञ गोपाल शंकरनारायण यांनी सांगितले की, ही बंदी केवळ दिवाळीपुरती नाही, तर संपूर्ण काळासाठी लागू आहे. फटाक्यांच्या ऑनलाइन विक्रीवरही बंदी आहे. यावेळी न्यायालयाने हिरवे फटाके तयार करण्याचे निर्देश दिले.



### मुंबईतील शिवाजी पार्क येथे १४ नोव्हेंबरला...



शिवाजी पार्कमध्ये दरवर्षी शिवसेना उद्धव ठाकरे यांचा दसरा मेळावा पार पडतो. याच मेळाव्यातून उद्धव ठाकरे भाजप आणि पंतप्रधानावर आरोप करतात. १४ नोव्हेंबर रोजी मोदी उद्धव ठाकरेंवर नेमका काय बोलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून देवळाली...



आनंदरोड मैदानावरील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल येथे ही भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून हजारो तरुण देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून उपस्थित झाले होते.

काहींची निवड झाली. तसेच अनेकांना या निवड प्रक्रियेत होणाऱ्या विविध चाचण्या पार करता न आल्याने सुमारे ९५ टक्के तरुणांच्या पदरी निराशा पडली. मोठ्या प्रमाणात तरुणाई दाखल झाल्याने बटालियनकडून भल्या पहाटे दोन वाजेपासून प्रक्रिया सुरुवात करण्यात आली. थंडीमध्ये कुडकुडत सर्वजण चार रांगेत बसले.

आनंद रोडपासून बसलेल्या तरुणांची रांग थेट लामरोडवरील महाराज बिरमणी यांच्या बंगल्यापर्यंत पोहचली होती. मंगळवारी मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे आणि नाशिक जिल्ह्यातील तरुणांसाठी भरती प्रक्रिया होईल. भरती प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शीपणे पार पाडण्यासाठी ११६ टीए पॅरा बटालियनचे अधिकारी आणि जवान प्रयत्नशील आहेत.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# लोकशाही मजबुतीसाठी धर्मनिरपेक्षता हे संवैधानिक मूल्य जपणे आवश्यक - संजय मंगला गोपाळ







**ठाणे (रोहित जैसवार)** - समाजात धर्मा धर्मात, जाती जातीत दुही माजवणाऱ्या वृत्तींना नाकारून, सर्वधर्म समभाव आणि धर्मनिरपेक्षता या संविधानाने दिलेल्या मूल्यांचे रक्षण करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे आणि ती निभावण्याची संधी या महिन्यात निवडणुकीने आपल्याला मिळाली आहे. तिचा पुरेपूर उपयोग करणे आपले कर्तव्य आहे, असे आग्रही प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी आज ठाण्यात केले. समता विचार प्रसारक संस्थेच्या सर्वधर्म समभाव सांस्कृतिक संमेलनात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, विविध धर्म, जाती, भाषा, पोशाख, रितीरिवाज यानी नटलेल्या आपल्या देशात एकमेकांचा आदर करुन प्रेममय राहावं या साने गुरुजी आणि संत, विचारवंत यांच्या विचारांवर चाललो तरच देशांत शांतता नांदेल आणि प्रगती होईल. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सर्व धर्मीय सामील होते. हा देश सर्व धर्मीय भारतीयांचा आहे, हे स्वातंत्र्य लढ्यातील मूल्य नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानात उतरले आहे. त्याच्या विरोधात काम करणाऱ्या सांप्रदायिक प्रयत्नांना विरोध करत समतेचे मूल्य आपण जपणे आवश्यक आहे. हे मूल्य रुजवण्यासाठी संस्थेतर्फे ईद, दिवाळी, गुरु नानक जयंती आणि नाताळच्या सणात सर्वधर्मीय संमेलने, गुरुद्वारा, चर्च व मशीद भेट आदी कार्यक्रम संस्था आयोजित करत असते, याचा त्यांनी उल्लेख केला.

**सांस्कृतिक कार्यक्रम प्रेममय साने गुरुजी**

यावेळी साने गुरुजींच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त, साने गुरुजी १२५ अभियानांतर्गत 'प्रेममय साने गुरुजी' हा कार्यक्रम सादर झाला. साने गुरुजींच्या प्रेमळ, करुणामयी पण तितक्याच कणखर व्यक्तीमत्वाचा वेध त्यांच्या कथा, लेख, गाणी आणि साने गुरुजींवर मान्यवरांनी लिहिलेले लेख यांच्या कथनाने आणि अभिवाचनाने घेणारा हा सांस्कृतिक कार्यक्रम, ठाण्यातील कलाकार व कार्यकर्त्यांनी सादर केला. यात, लतिका सु. मो. यांनी गुरुजींच्या जीवनावरील पत्रावळ आणि घाण या कथा सादर केल्या. नीलिमा सबनीस यांनी दलितांना पंढरपूर मंदिर प्रवेशाच्या वेळचे गुरुजींचे विचार सादर केले. अलका जोशी यांनी एस एम जोशी यांची गुरुजींचा त्यांच्यावरील प्रभाव व्यक्त करणारी नास्तिक कथा सादर केली. राजश्री भिसे यांनी गुरुजींना आलेला कडू-वाईट अनुभव आणि त्याचा त्यांच्या लेखनात उमटलेला सकारात्मक हुंकार सांगणाऱ्या कथा सादर केल्या. मीनल उत्तुरकर यांनी गुरुजींचे आंतरभारतीचे विचार मांडले. विशाखा देशपांडे यांनी निवेदन करताना स्वातंत्र्य लढ्यात गुरुजी तुरुंगवासात अनन्वित अत्याचार सहन करत असतांना गुरुजींनी केलेल्या विपुल लेखनाचा वेध घेतला. संजय मंगला गोपाळ यांनी गुरुजींचे आता उठवू सारे रान हे गाणे सध्यस्थितीचा संदर्भ देत सादर केले. खरा तो एकाची धर्म जगाला प्रेम अर्पावे या सामूहिक प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि बलसागर भारत होवो या समूहगीताने समारोप करण्यात आला.

**क्रीडा जल्लोष बक्षीस वितरण संपन्न**

समता विचार प्रसारक संस्थेच्या आणि वी नीड यू सोसायटीच्या एकलव्य विद्यार्थी, कार्यकर्ते यांनी नृत्य, गाणी असा रंगारंग कार्यक्रम सादर करुन मजा आणली. यात नियती कदम, पूजा गावडे, तेजश्री मगर, रूपाली तांगडे, भारती कांबळे, शिवशंकर गवळी यानी नृत्य पेश केली. विमल वर्मा हिने आत्मविश्वासाचे महत्व यावर आपले मनोगत व्यक्त केले. समता विचार प्रसारक संस्थेतर्फे दर वर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा स्मृतिशेष हिरजी गोहिल क्रीडा जल्लोष संपन्न झाला. क्रिकेट, कबड्डी, कॅरम, बुद्धीबळ हे खेळ तसेच चित्रकला, रांगोळी, मेहंदी, हस्तकला या कलांमध्ये एकलव्य मुलांनी सहभाग घेतला. या सर्व सहभागी मुली मुलांना अध्यक्ष हर्षलता कदम, विश्वस्त मनीषा जोशी, हितचिंतक रवींद्र नी. ता. आदींच्या हस्ते बक्षिसे देण्याचा समारंभही यावेळी पार पडला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकारी सचिव अजय भोसले, एनोक कोलियार आदींनी विशेष मेहनत घेतली.

## ठाण्यात मतदान केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवा; राजन विचारे यांची निवडणूक अधिकाऱ्यांकडे मागणी

**ठाणे (सुचित शिंदे) :** बोगस मतदारांची नावे अद्याप वगळण्यात आली नसल्याने लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही फटका बसण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे बोगस मतदानाला आळा घालण्यासाठी ठाण्यातील सर्व मतदान केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली आहे.

काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या ठाणे लोकसभा मतदारसंघात प्रत्येक केंद्रांवर बोगस मतदानाची संख्या मोठ्या प्रमाणात निदर्शनास आली आहे. याला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि निवडणूक आयोग सपशेल फेल ठरले आहेत.

याप्रकरणी शिवसेना नेते, तसेच ठाणे शहर विधानसभेचे उमेदवार राजन विचारे यांच्या नेतृत्वाखाली बोगस आणि दुबार नावांची पुराव्यासह यादी देण्यात आली. मात्र त्यानंतरही मतदार यादीतून नावे वगळण्यात आली नसल्याने बोगस मतदान होण्याची शक्यता लक्षात घेऊन ठाणे विधानसभा क्षेत्रातील एकूण ४०७ मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे अशी मागणी विचारे यांनी केली आहे.

## मुंबईतील कांदिवली येथे १४ कुत्र्यांची हत्या करून त्यांना गटारात फेकलं !

**मुंबई (विशाल कारंडे) :** मुंबईतील कांदिवली परिसरातून धक्कादायक घटना उघडकीस आली. कांदिवली पश्चिम येथील मंगलमयी इमारतीजवळील गटारात १४ कुत्रे मृतावस्थेत आढळल्याने परिसरात खळबळ माजली आहे. या कुत्र्यांची हत्या करण्यात आली, असा आरोप श्वानप्रेमींनी केला आहे.



कांदिवली येथील रहिवासी हिना लांबाचिया यांनी याबाबतचा व्हिडिओ इन्स्टाग्रामवर पोस्ट केला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे.

सोमवारी पहाटे १.२४ वाजता कांदिवली पोलिसांनी प्राण्यांच्या क्रूरतेप्रकरणी गुन्हा नोंदवला. दस्तऐवजात भारतीय न्याय संहिताच्या कलम ३२५ आणि प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा, १९६० च्या कलम ११ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही घटना ९ नोव्हेंबर रोजी घडल्याचे सांगितले जात आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहे.

## डोंबिवलीकर किलबिल फेस्टिवलमध्ये बच्चे कंपनीने केली धमाल

**कल्याण (आकाश कांबळे) :** डोंबिवलीकर बाल दोस्तांच्या आवडीचा किलबिल फेस्टिवल रविवारी बालगोपाळांच्या धमाल मजा मस्तीत डोंबिवलीच्या रेल्वे मैदानावर प्रचंड उत्साहात साजरा झाला. डोंबिवलीकर प्रतिष्ठानतर्फे आयोजित या किलबिल फेस्टिवलचे यंदाचे १२ वे वर्ष होते. हजारो डोंबिवलीकर मुला मुलींनी या उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. लेखक दिग्दर्शक दिगपाल लांजेकर यांच्या संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई या लवकरच प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटात मुक्ताईची मुख्य भूमिका करणाऱ्या इश्मिता जोशी आणि ज्ञानेश्वरांची भूमिका करणाऱ्या मानस बेडेकर या वेध अकॅडेमीच्या डोंबिवलीकर



बालकलाकारांच्या हस्ते फेस्टिवलचे उदघाटन झाले.

डोंबिवलीत वर्षभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन होत असते पण बालगोपाळांसाठी डोंबिवलीच्या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या वर्दळीत डोंबिवलीकर किलबिल फेस्टिवल म्हणजे बाळगोपाळांसाठी हक्काचा खराखुरा बालदिन. मुलांना खेळा-शिका-स्वतः बनवा या संकल्पनेच्या माध्यमातून हा मौज मजा धमाल मस्तीचा अविस्मरणीय उत्सव सुरु झाला. त्यात मुलं चित्रकला, टॅटू, कॅरिकेचर करतात, कुंभाराच्या चाकावर मातीची भांडी घडवतात, वायरची खेळणी कशी बनवतात ते शिकतात.

याच बरोबर बोलक्या बाहुल्या, जम्पिंग मून वॉक, बालनाट्य, जादूचे प्रयोग असे कार्यक्रमही पाहायला मुलांबरोबर आई बाबा आजी आजोबांचे मनही बालक होऊन जातं अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया अनेक डोंबिवलीकर पालकांनी दिली. मुलं आणि पालक इतके हरखून गेलेले की उत्सव प्रवेशद्वारापासून ते आत मध्ये प्रत्येक बहुरूपी व्यक्तिमत्वांबरोबर छायाचित्र काढण्याची चढाओढ लागली होती. यंदा तर थाऊसंड हॅंड डान्स ग्रुप आणि झिरो डिग्री डान्स, हा भन्नाट डान्स आकर्षणाचा विषय ठरला. याच बरोबर जायंट पांडा, टेडी बेअर, हेडलेस मॅन, अल्लाउद्दीनचा जिन अशा विविध बहुरूप्यांसोबत सेल्फी काढण्याची बालदोस्तांची स्पर्धा लागली होती.

साहसी खेळांमध्ये कमांडो ब्रिज, रिव्हर क्रॉसिंग, वॉल क्लायंबिंग या थरारक प्रकारांनी यावर्षीही मुलांची गर्दी खेचली. तर तांदुळावर नाव कोरणे, मेंदी, लाखेच्या बांगड्या हे लाडक्या छोट्या बहिणीसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. डोंबिवलीकर किलबिल महोत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे सर्व खेळ आणि सुविधा डोंबिवलीकर बाळ गोपाळांसाठी मोफत असतात त्यामुळे डोंबिवलीच्या कानाकोपऱ्यातून किलबिल फेस्टिवलला कुटुंब आवर्जून हजेरी लावतात असे आयोजकांनी सांगितले.

## पोलीस कोठडीतून फरार झालेला उत्तर प्रदेशातून अटकेत

**ठाणे (यश सावंत) :** चितळसर पोलिसांच्या कोठडीतून फरार झालेल्या प्रिन्स विश्वकर्मा (१९) याला शनिवारी उत्तरप्रदेश येथील लखनौमधून अटक करण्यात आली आहे. प्रिन्स याला बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगल्याप्रकरणी अटक झाली होती. परंतु गुरुवारी गुन्हे प्रकटीकरण कक्षातून बेड्या काढून तो पळून गेला होता. तेव्हापासून पोलीस त्याचा शोध घेत होते.

चितळसर पोलिसांनी प्रिन्स याला ५ नोव्हेंबरला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता पोलिसांना त्याच्याकडून एक पिस्तूल आणि तीन काडतुसे आढळून आली होती. त्याला ठाणे न्यायालयात हजर केल्यानंतर पोलिसांना त्याची कोठडी मिळाली होती. गुन्ह्याचा तपास प्राथमिक असल्याने त्याला चितळसर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण कक्षामध्ये ठेवण्यात आले होते. त्याला बेड्या देखील घालण्यात आल्या होत्या. पोलीस ठाण्यातील एक पोलीस शिपाई त्याच्यावर पाहारा ठेवण्यासाठी नेमला होता. गुरुवारी पहाटे ३.३० वाजताच्या सुमारास संबंधित पोलीस कर्मचारी स्वच्छतागृहात गेला असता, विश्वकर्मा हा हातातील बेड्या हातचालाखीने काढून फरार झाला. फरार होताना त्याने गुन्हे प्रकटीकरण कक्षाच्या दरवाजाची कडी बाहेरून लावली. शिपाई स्वच्छतागृहातून बाहेर आला असता, विश्वकर्मा तेथे आढळून आला नव्हता.

तसेच त्याने बाहेरून कडी लावल्याने कर्मचाऱ्याला तेथून बाहेर देखील पडता आले नाही. या नंतर कर्मचाऱ्याने त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मोबाईलद्वारे संपर्क साधला. कक्षाच्या दरवाजाची कडी उघडल्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु तो आढळून आला नाही.याप्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, प्रिन्स हा उत्तर प्रदेशमधील लखनौ भागात असल्याची माहिती चितळसर पोलिसांना मिळाली होती. त्याआधारे, चितळसर पोलिसांचे पथक लखनौला रवाना झाले. शनिवारी लखनौ पोलिसांच्या मदतीने चितळसर पोलिसांनी विश्वकर्मा याला ताब्यात घेतले.

## उल्हासनगरात भरारी पथकातील ५ जणांवर खंडणीचा गुन्हा दाखल

**उल्हासनगर (गणेश बागडे) :** उल्हासनगरात अवैधपणे रोख रक्कम पकडण्यासाठी नेमलेल्या भरारी पथकावरच खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. या पथकातील कर्मचाऱ्यांनी एका फुल व्यापाऱ्याकडे सापडलेली रक्कम जप्त करण्याची भीती घालत त्याच्याकडून८५ हजार रुपयांची खंडणी उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी उल्हासनगर महापालिकेच्या तीन कर्मचाऱ्यांसह दोन पोलिसांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बबन आमले नामक फुल व्यापाऱ्याने दसरा आणि दिवाळीसाठी पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यातील फुल व्यापाऱ्यांकडून फुलं



खरेदी केली होती. त्याचे पैसे शेतकऱ्यांना रोख स्वरूपात देण्यासाठी आमले हे त्यांच्या मित्रासह साडेसात लाख रुपयांची रोकड घेऊन कल्याणहून मुरबाडच्या दिशेने निघाले होते. यावेळी म्हारळ परिसरातील तपासणी नाक्यावर भरारी पथकाने त्यांची गाडी थांबवून तपासणी केली असता त्यात रोकड आढळून आली.त्यावर आमले यांनी फुलं खरेदी विक्रीच्या पावत्या आणि बिलं त्यांना दाखवत ही रक्कम शेतकऱ्यांची असल्याचं त्यांना सांगितलं. मात्र तरीही भरारी पथकाचे प्रमुख संदीप शिरसवाल यांनी त्यांना तुमची सर्व रोकड जप्त होईल आणि तुमच्यावर गुन्हा दाखल करू, अशी भीती दाखवत त्यांच्याकडून ८५ हजार रुपयांची खंडणी उकळली. त्यांच्या या कृत्यात भरारी पथकातील संकेत चनपूर, अण्णासाहेब बोरुडे या दोन कर्मचाऱ्यांसोबतच पोलीस हवालदार विश्वनाथ ठाकूर आणि पोलीस नाईक राजरत्न बुकटे यांनीही साथ दिली.

मात्र याबाबत फुल व्यापारी आमले यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे फोनवरून तक्रार केल्यानंतर दुसऱ्या दिवशी आमले हे त्याच मार्गाने परत जात असताना शिरसवाल याने ही रक्कम त्यांना परत केली. दरम्यान, रक्कम जरी परत केली असली तरी खंडणी उकळण्याचा प्रकार मात्र घडला असल्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार या प्रकरणी या सर्वांच्या विरोधात उल्हासनगर पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी संदीप शिरसवाल, संकेत चनपुर आणि अण्णासाहेब बोरुडे हे तिघे उल्हासनगर महापालिकेतील लिपिक असून गुन्हा दाखल झाल्यानंतर या सर्वांना तडकाफडकी निलंबित करण्यात आलं आहे. तर पोलीस हवालदार विश्वनाथ ठाकूर आणि पोलीस नाईक राजरत्न बुकटे या दोन पोलिसांविरोधात पोलीस आयुक्तांकडे रिपोर्ट पाठवला असून वरिष्ठांच्या सूचनेनुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याचं उल्हासनगरचे सहाय्यक पोलीस आयुक्त अमोल कोळी यांनी सांगितलं आहे.

## ठाणे जिल्ह्यात दि. ११ नोव्हेंबर पर्यंत २३ कोटी ४१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



**ठाणे (सुचित शिंदे)** - विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यात व ठाणे जिल्ह्यात भारत निवडणूक आयोगामार्फत आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या आचारसंहिता काळात नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात प्रशासनामार्फत कठोर कारवाई करण्यात येते. या अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमधून दि. ११ नोव्हेंबर २०२४ पर्यंत एकूण २३ कोटी ४१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल प्रशासनाकडून जप्त करण्यात आला आहे.

यामध्ये १२ कोटी ४१ लाख १६ हजार रोख रक्कम, २ कोटी २२ लाख १४ हजार रुपये किंमतीचा मद्यसाठा, १ कोटी ६४ लाख ७० हजार रुपये किंमतीचे अंमली पदार्थ, २३ लाख २६ हजार रुपये किंमतीच्या मौल्यवान वस्तू / दागिने आणि ६ कोटी ८९ लाख ७९ हजार रुपये किंमतीचे मोफत वाटपाचे साहित्य ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमधून प्रशासनाकडून जप्त करण्यात आले आहे.




# प्रवीण तरडेंच्या वाढदिवसानिमित्त पत्नी स्नेहलची मिश्किल पोस्ट


'मुळशी पॅटर्न' या सिनेमाचं नाव जरी घेतलं डोळ्यासमोर दिग्दर्शक प्रवीण तरडे येतात. मराठी कलाविश्वातील बहुआयामी दिग्दर्शक म्हणून त्यांना ओळखलं जातं. 'रेगे', 'देऊळ बंद', 'मुळशी पॅटर्न'पासून सुरू झालेला प्रवीण तरडेंचा प्रवास आता 'धर्मवीर २' पर्यंत येऊन पोहोचला आहे. आज प्रवीण तरडे त्यांचा पन्नासावा वाढदिवस साजरा करत आहेत. यानिमित्ताने त्यांच्या पत्नीने खास पोस्ट शेअर करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रायोगिक नाटकांसाठी काम करत असताना प्रवीण तरडेंची स्नेहलशी ओळख झाली. काही दिवसांत दोघांमध्ये मैत्री झाली आणि पुढे या मैत्रीचं रुपांतर प्रेमात होऊन दोघांनी २००९ मध्ये लग्नगाठ बांधली. आज पतीच्या वाढदिवसानिमित्त स्नेहलने खास पोस्ट शेअर करत प्रवीण तरडेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

स्नेहल यांनी प्रवीण तरडेंबरोबरचा एका कार्यक्रमातील फोटो शेअर केला आहे. यामध्ये अभिनेते आपल्या पत्नीच्या खांद्यावर हात ठेऊन तिच्याशी गप्पा मारत असल्याचं पाहायला मिळत आहे. स्नेहल तरडे मिश्किल पोस्ट करत लिहितात, "वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा...मी भाईचा बर्थडे गाणं नाही लावू शकत नाही." तरडेंना दोस्तांचा दिग्दर्शक म्हणून ओळखलं जातं. त्यामुळे बहुतांश सगळेच जण प्रवीण तरडेंच्या वाढदिवसानिमित्त मुळशी पॅटर्नमधलं 'भाईचा बर्थडे' गाणं लावतात. पण, स्नेहल त्यांच्या पत्नी असल्याने हे गाणं लावू शकत नाहीत असं अभिनेत्रीला या पोस्टमधून सुचित करायचं आहे.

दरम्यान, प्रवीण तरडेंच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर कथा, पटकथा, संवाद, लेखक, दिग्दर्शक... सिनेविश्वातील कोणतंच क्षेत्र त्यांना वर्ज राहिलेलं नाही. इतिहासातील सरसेनापती हंबीरराव असोत किंवा मुळशीतील नन्या भाई प्रत्येक भूमिका प्रवीण तरडेंनी पडद्यावर उत्तमरित्या साकारल्या आहेत. नुकतंच त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'धर्मवीर २' सिनेमाचं देखील सर्वत्र कौतुक करण्यात आलं.

# अभिनेता हेमंत ढोमेच्या कुटुंबात आली नवीन सदस्य, नाव आहे खूपच खास




अभिनेता, लेखक, दिग्दर्शक, निर्माता या चारही भूमिका उत्तमरित्या पेलणारा कलाकार म्हणजे हेमंत ढोमे. हेमंत नेहमी वेगवेगळ्या विषयांवर चित्रपट घेऊन येत असतो. 'पोस्टर गर्ल', 'बघतोस काय मुजरा कर', 'झिम्मा', 'झिम्मा २' यांसारखे दर्जेदार चित्रपट हेमंतने मराठी चित्रपटसृष्टीला दिले आहेत. नवीन वर्षात हेमंत नवा चित्रपट घेऊन येत आहे. 'फसक्लास दाभाडे' असं चित्रपटाचं नाव आहे. अशातच हेमंत ढोमेच्या कुटुंबात नवीन सदस्य आली आहे; जिच्या फोटोने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे.

अभिनेता हेमंत ढोमे सोशल मीडियावर खूप सक्रिय असतो. आपल्या कामासह वैयक्तिक आयुष्यातल्या गोष्टी चाहत्यांबरोबर शेअर करत असतो. शिवाय आजूबाजूला चालणाऱ्या घडामोडींवरही हेमंत परखड मतं मांडत असतो. नुकतंच त्याने कुटुंबात आलेल्या नवीन सदस्याचा फोटो शेअर केला आहे.

हेमंत ढोमेच्या कुटुंबात आलेली ही नवीन सदस्य गाय आहे. या गायीचा फोटो शेअर करत हेमंत म्हणाला, "आपल्या फॅमिलीची नवी मेंबर. लक्ष्मी ढोमे." त्यानंतर हेमंतने गायीचा अजून एक फोटो शेअर केला आहे. ज्यामध्ये त्याने लिहिलं आहे, "देखणी लक्ष्मी." हेमंतने शेअर केलेल्या या सुंदर गायीचे फोटो सध्या चांगलेच चर्चेत आले आहेत.

दरम्यान, हेमंत ढोमेच्या आगामी कामाबद्दल बोलायचं झालं, तर त्याचा 'फसक्लास दाभाडे' प्रदर्शनाच्या मार्गावर आहे. खुळ्या भावंडांची इरसाल स्टोरी या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. हेमंत ढोमे लिखित आणि दिग्दर्शित 'फसक्लास दाभाडे' चित्रपटात अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, क्षिती जोग, निवेदिता सराफ, हरीश दुधाडे, राजसी भावे, राजन भिसे असे तगडे कलाकार मंडळी पाहायला मिळणार आहेत. 'फसक्लास दाभाडे' चित्रपट २४ जानेवर २०२५ला प्रदर्शित होणार आहे. काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाचा जबरदस्त पोस्टर प्रदर्शित झाला होता.

# अभिनेत्री हेमल इंगळे लवकरच अडकणार विवाहबंधनात



मराठी कलाविश्वात गेल्या वर्षात अनेक अभिनेत्रींनी लग्नगाठ बांधली. शिवानी सुर्वे, तितीक्षा तावडे, पूजा सावंत अशा अनेक अभिनेत्रींनी लग्नगाठ बांधल्यानंतर आता 'नवरा माझा नवसाचा २' फेम अभिनेत्री हेमल इंगळेही लवकरच लग्नगाठ बांधणार आहे. हेमलचा याच वर्षी ऑगस्ट महिन्यात साखरपुडा झाला होता. आपला बॉयफ्रेंड रोनक बरोबर ती विवाहबंधनात अडकणार आहे. नुकतंच हेमलने तिच्या bride to be पार्टीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे.

हेमलने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती तिच्या मैत्रिणीसमवेत बसली असून एक केक कापताना दिसत आहे. हेमल जेव्हा केक कापते तेव्हा तिच्या मैत्रिणी ब्रायडल शॉवर टू यू अस म्हणत जल्लोष करताना दिसत आहेत. हेमलच्या मैत्रिणी तिच्या नावासह फियोन्से फियोन्से अस म्हणतात. यानंतर ती मिस हेमल नाही तर मिसेस हेमल होणार अस म्हणतात. यानंतर हेमल तिच्या मैत्रिणींनी केक भरवते.

**हेमलने मानले मैत्रिणींचे आभार**

हेमलने हा व्हिडीओ शेअर करताना एक कॅप्शन देत त्यात लिहिलं की, "या खोलीत माझ्या आयुष्यातील सर्व प्रेमळ लोक एकत्र आहेत. हे सर्व हे सगळं जुळवून आणल्याबद्दल तुमचे मनापासून आभार! माझ्यासाठी प्रत्येक क्षण अविस्मरणीय होता, आणि ही आठवण मी आयुष्यभर जपेन! पण आत्ता, तुम्हा सगळ्यांबरोबर केक कापतानाचा हा भन्नाट व्हिडीओ शेअर करायला मला खूप आवडेल. हा व्हिडीओ माझ्या मैत्रीचं सार मांडतो."

**ऑगस्ट महिन्यात झाला होता हेमलचा साखरपुडा**

ऑगस्ट २०२४ मध्ये आपल्या होणाऱ्या नवऱ्याला 'एक्स बॉयफ्रेंड' म्हणत हेमलने इन्स्टाग्रामवर साखरपुड्याचा फोटो शेअर होता. होणाऱ्या नवऱ्याबरोबरचा रोमँटिक फोटो शेअर करत अभिनेत्रीने साखरपुड्याची आनंदाची बातमी चाहत्यांना दिली होती.

हेमलच्या 'नवरा माझा नवसाचा २' या सिनेमाने नुकतंच सिनेमागृहात ५० दिवस पूर्ण केले आहेत. या सिनेमात हेमलने स्वप्नील जोशी, सचिन पिळगावकर, सुप्रिया पिळगावकर आणि अशोक सराफ या दिग्गज कलाकारांबरोबर स्क्रीन शेअर केली आहे. या सिनेमाने बॉक्स ऑफिसवरही चांगली कमाई केली आहे. हेमलच 'नवरा माझा नवसाचा २' सिनेमातील कामामुळे कौतुक होत आहे.

# अखेर मधुभाऊंची जेलमधून होणार सुटका! अर्जुनने कोर्टात घेतली मोठी जबाबदारी

'ठरलं तर मग' मालिकेत पुन्हा एकदा कोर्टरुम ड्रामा सुरू होणार आहे. सध्या सायलीने अर्जुन मधुभाऊंची सुटका करण्यासाठी विलंब करतोय असा गैरसमज करून घेतला आहे. ती याची खंत अर्जुनसमोर व्यक्त देखील करते. सायलीने केलेला गैरसमज ऐकून तो काहीसा नाराज होतो. पण, तिचा विश्वास आपण पुन्हा एकदा संपादन केला पाहिजे अशी इच्छा त्याच्या मनात असते. त्यामुळे आता कोर्टात भक्कम पुरावे सादर करून अर्जुन मधुभाऊंची जेलमधून सुटका करून घेणार आहे.




अर्जुन मधुभाऊंची सुटका करून घेण्यासाठी संपूर्ण जबाबदारी आपल्या खांद्यावर घेणार आहे. यासाठी तो कोर्टात म्हणतो, "मधुभाऊ रोज पोलिसांच्या कॉन्टॅक्टमध्ये राहतील आणि हवं तर रोज पोलीस स्टेशनमध्ये हजेरी देतील. याची संपूर्ण गॅरंटी मी त्यांचा वकील म्हणून मी तुम्हाला देतो. पण, आता मी सादर केलेल्या पुराव्यांमुळे मधुभाऊंना बेल मिळायलाच हवी."

अर्जुनने आपली बाजू मांडल्यावर न्यायाधीश म्हणतात, "ॲडव्होकेट पवार आणि ॲडव्होकेट सुभेदार यांनी कोर्टात सादर केलेल्या पुराव्यांनुसार हे कोर्ट मधुकर पाटील यांना जामिनावर सोडवण्याचा आदेश देत आहे." यानंतर साक्षी शिखरे, प्रिया, महिपत यांच्या चेहऱ्यावरचा रंग पूर्णपणे उडतो. तर, दुसऱ्या बाजूला

दरम्यान, 'ठरलं तर मग' मालिकेत लवकरच दिवाळीचा सीक्वेन्स सुरू होणार आहे. सणाच्या निमित्ताने मालिकेत मधुभाऊंची रिएन्ट्री होणार आहे. तुळशीसमोर दिवा लावताना मधुभाऊ आपल्या लेकीला आवाज देतात. आपल्या वडिलांना सणाच्या दिवशी घरी परत आलेलं पाहून सायलीला प्रचंड आनंद होतो. ती धावत जाऊन मधुभाऊंना मिठी मारते. यादरम्यान ती प्रचंड रडत असते.

आपल्या नवऱ्याने मधुभाऊंची सुटका केलीये हे पाहताच सायली पटकन अर्जुनला मिठी मारते. . 'ठरलं तर मग' मालिकेचा हा विशेष भाग १३ नोव्हेंबरला रात्री ८.३० वाजता प्रसारित केला जाणार आहे.

# सूरज चव्हाणने मागितली चाहत्यांची माफी!

'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वाचा विजेता सूरज चव्हाण सध्या सर्वत्र चर्चेत आहे. शो संपल्यावर या कार्यक्रमातील त्याचे सहस्पर्धक सूरजला भेटण्यासाठी खास त्याच्या मोढवे गावी जात आहेत. धनंजय पोवार, वैभव चव्हाण, इरिना, जान्हवी किल्लेकर ही मंडळी दिवाळीत सूरजला भेटण्यासाठी गेली होती. आता नुकतीच 'कोकण हार्टेड गर्ल' अंकिता प्रभू वालावलकर आपल्या होणाऱ्या नवऱ्यासह सूरजला भेटून आली.

सूरजच्या गावी गेल्यावर यापैकी काही जणांनी व्हिडीओ, फोटो शेअर केले होते. याशिवाय सूरजने देखील जान्हवी किल्लेकर, अंकिता यांच्याबरोबर फोटो-व्हिडीओ शेअर केले होते. यामध्ये जान्हवीने सूरजबरोबर गावच्या शेतात ट्रॅक्टर चालवणं असो, डीपीने सूरजच्या घरी जाऊन त्याची भेट घेणं ते अंकिताने त्याच्या रानात बसून खाल्लेली भाकरी अन् चटणी असो या सगळ्या फोटो अन् व्हिडीओजचा समावेश होता. मात्र, या सगळ्या पोस्ट आता सूरज चव्हाणच्या अकाऊंटवरून डिलीट झाल्या आहेत.



सूरजच्या अकाऊंटवरून त्याच्या जवळच्या मित्रमंडळींच्या पोस्ट डिलीट कशा झाल्या? अशा चर्चा सोशल मीडियावर रंगलेल्या असतानाच या संपूर्ण प्रकरणावर सूरजच्या टीमने इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत स्पष्टीकरण दिलं आहे. सूरजचं शिक्षण पूर्ण झालेलं नसल्याने त्याची सोशल मीडिया अकाऊंट्स त्याचा भाचा व काही जवळचे मित्र हाताळतात. या टीमने पोस्ट शेअर करत सूरजच्या इन्स्टाग्राम अकाऊंटचा प्रॉब्लेम झाल्याची माहिती दिली आहे.

**सूरज चव्हाणची पोस्ट**

नमस्कार मी आपल्या सर्वांचा, महाराष्ट्राचा लाडका सूरज चव्हाण. माझ्या इन्स्टाग्राम अकाऊंटचा काहीतरी प्रॉब्लेम असल्यामुळे काही अत्यंत महत्त्वाच्या पोस्ट्स डिलीट झाल्या आहेत. त्यामध्ये माझ्या अंकिता ताई आणि जान्हवी ताईच्या पण पोस्ट होत्या. यापुढे मी स्वत: लक्ष देईन आणि काळजी घेईन. तर आपणा कुणाचे मन दुखावले असेल तर मोठ्या मनाने मला माफ करा! आपलाच सूरज चव्हाण!

दरम्यान, सूरज चव्हाणला काही दिवसांपूर्वी सुद्धा सोशल मीडियाचा वाईट अनुभव आला होता. त्याच्या नावे बनावट अकाऊंट्स तयार करून सूरजच्या चाहत्यांना लुबाडण्याचा प्रकार सुरू होता. ही गोष्ट समोर येताच तेव्हा देखील या 'गुलीगत किंग'ने पोस्ट शेअर करत अशा कोणत्याच आर्थिक फसवणुकीला बळी पडू नका असं आवाहन आपल्या चाहत्यांना केलं होतं.

## दिनविशेष

**घटना :**

१९०५ : नॉर्वेच्या लोकांनी प्रजासत्ताक बनण्याऐवजी राजेशाही टिकवून ठेवण्यासाठी सार्वमत घेतले.
१९१८ : ऑस्ट्रिया प्रजासत्ताक बनले.
१९२७ : लिओन ट्रॉटस्कीची सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षातून हकालपट्टी करण्यात आली, जोसेफ स्टॅलिनकडे सर्व सत्ता सोडण्यात आली.
१९३० : पहिली गोलमेज परिषद सुरू झाली.
१९४५ : महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी राजकीय परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी पुण्यात साडेदहा तासांची बैठक घेतली.
१९५६ : मोरोक्को, सुदान आणि ट्युनिशिया संयुक्त राष्ट्रात सामील झाले.
१९८० : NASA स्पेस प्रोब व्हॉयेजर-I ने शनि ग्रहाच्या सर्वात जवळ जाऊन त्याच्या वलयांची पहिली प्रतिमा घेतली.
१९८१ : स्पेस शटल प्रोग्राम: मिशन STS-२, स्पेस शटल कोलंबियाचा वापर करून, प्रथमच क्रूड स्पेसक्राफ्ट दोनदा अवकाशात सोडण्यात आले.
१९९० : टिम बर्नर्स-ली यांनी वर्ल्ड वाइड वेबसाठी औपचारिक प्रस्ताव प्रकाशित केला.
१९९५ : स्पेस शटल अटलांटिस रशियन स्पेस स्टेशन मीरला मीर डॉकिंग मॉड्यूल वितरीत करण्यासाठी STS-७४ वर प्रक्षेपित केले.
१९९७ : रामोजी युसेफला १९९३ च्या वर्ल्ड ट्रेड सेंटर बॉम्बस्फोटासाठी दोषी ठरवण्यात आले.
१९९८ : परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांना व्हिसाशिवाय मायदेशी येण्याची सुविधा देणारी पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजीन (PIO) ओळखपत्र योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी जाहीर केले.
२००० : १२ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय सार्वजनिक प्रसारण दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**जन्म :**

१८१७ : 'बहाउल्ला' – बहाई पंथाचे संस्थापक यांचा जन्म. (मृत्यू: २९ मे १८९२)
१८१९ : 'मोनियर मोनियर-विल्यम्समोनियर' – भाषाशास्त्रज्ञ आणि शब्दकोश संकलक यांचा जन्म.
१८६६ : 'सन यट-सेन' – चीन प्रजासत्ताक चे पहिले अध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू: १२ मार्च १९२५)
१८८० : 'सेनापती बापट' – सशस्त्र क्रांतिकारक, तत्वचिंतक व लढाऊ समाजसेवक यांचा जन्म. (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९६७)
१८८९ : 'डेव्हिट वॅलेस' – रीडर डायजेस्टचे सह्संथापक यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑगस्ट १९८१)
१८९६ : 'डॉ.सलीम मोईनुद्दिन अब्दुल अली' – आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय पक्षीतज्ञ यांचा जन्म. (मृत्यू: २७ जुलै १९८७)

**मृत्यू :**

१९४६ : 'पण्डित मदन मोहन मालवीय' – बनारस हिंदू विश्वविद्यालयाचे एक संस्थापक यांचे निधन. (जन्म: २५ डिसेंबर १८६१)
१९५९ : 'सेवानंद गजानन नारायण कानिटकर' -अनाथ विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक यांचे निधन. (जन्म: १८ ऑगस्ट १८८६)
१९५९ : 'केशवराव मारुतराव जेधे' – स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक प्रमुख नेते, शेतकरी कामगार पक्षाचे एक संस्थापक यांचे निधन. (जन्म: ९ मे १८८६)
१९९७ : 'वेदाचार्य विनायक भट्ट घैसास गुरुजी' – वेदाध्ययन आणि त्याचा प्रसार यासाठी संपूर्ण आयुष्य वाहिलेले आचारनिष्ठ घनपाठी यांचे निधन.
२००५ : 'प्रा. मधू दंडवते' – रेल्वे मंत्री, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य, अर्थतज्ञ यांचे निधन. (जन्म: २१ जानेवारी १९२४)
2007 : 'के. सी. इब्राहिम' – भारतीय क्रिकेटर यांचे निधन. (जन्म: 26 जानेवारी 1919)

## राशी भविष्य

**मेष** – आपल्या धंद्यात वाढ करू शकाल. तुमचा विचार इतरांना पटवून देता येईल. कठीण काम करा. निष्कारण वाद वाढवू नका.
**वृषभ** – महत्त्वाची रेंगाळलेली कामे होतील. उत्साह वाढेल. नाराज झालेल्यांना खूश करता येईल. धंदा वाढेल. प्रकृतीची काळजी घ्यावी.
**मिथुन** – महत्त्वाचा निर्णय घेताना सर्वांचा विचार करा. आपल्या कामातील अडचणी कमी होतील. अरेरावी करू नका. नेहमी नम्रपणे बोला.
**कर्क** – व्यवसायात अनुकूल ग्रहमान राहील. अडचणींवर मात करू शकाल. नवीन संधी उपलब्ध होतील. आपल्या रागावर ताबा ठेवावा.
**सिंह** – अनुभवी माणसांचा सल्ला उपयोगी येईल. सर्वांचे सहाय्य घेता येईल. मोठ्यांचा मान राखा. मैत्री होईल. सावधपणे गुंतवणूक करावी.
**कन्या** – धंद्यात फायद्याचे काम मिळेल. कुठल्याही स्वरूपाचे वादविवाद टाळावेत. चर्चा यशस्वी होईल. निर्णय अचूक ठरेल. जुने मित्र भेटतील.
**तूळ** – आर्थिक स्थिरता लाभेल. अनेक कामे करण्याचा प्रयत्न त्रासदायक ठरेल. मनाची द्विधा अवस्था होईल. वेळेनुसार निर्णय घ्या.
**वृश्चिक** – नोकरीत वरिष्ठांची मदत मिळेल. नवीन काम मिळवता येईल. खर्चावर बंधने घाला. राग वाढवू नका. सर्वांशी सुसंवाद राहील.
**धनु** – गैरसमज टाळण्याचा प्रयत्न करावा. आपला प्रभाव पडेल. आपल्या धंद्यात वाढ होईल. भागीदाराबरोबर चर्चा यशस्वी होईल.
**मकर** – कामात तत्परता दाखवाल. आपला प्रभाव पडेल. स्पर्धा जिंकता येईल. ओळखी वाढतील. वसुली करा. भावंडांशी वादविवाद टाळावेत.
**कुंभ** – कौटुंबिक समस्या सोडवाल. नातेवाईकांशी, आप्तेष्टांशी भेटीचे योग आहेत. कुणालाही कमी लेखू नका. तुमचे विचार योग्य ठरतील.
**मीन** – व्यवसाय, नोकरीत प्रतिष्ठा प्राप्त होईल. नवीन योजना राबवता येतील. नवीन ओळख झाली तरी मोहात पडू नका. सावध राहा.

# कळसांबडे ग्रामस्थांचा विधानसभा निवडणूक मतदानावर बहिष्कार

**तळा (भावना जैन)** - रायगड जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू असली तरी श्रीवर्धन मतदार संघाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून आहे राज्याच्या महिला बालविकास मंत्री यांच्या या मतदार संघात तळा तालुक्यातील कळसांबडे गावाने मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे कळसांबडे हे गाव राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा बालेकिल्ला समजला जातो आणि या बालेकिल्ल्यात गेल्या पाच वर्षात आम्हाला दिलेली आश्वासनं पाळली गेलेली नाहीत.प्रलंबित विकासकामे व सर्वसामान्यांच्या मूलभूत प्रश्नांवर



येथील खासदार,आमदार,मंत्री यांच्याकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे विधानसभा निवडणूकीसाठी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला असल्याने याचा थेट फटका अजित पवार पक्षाच्या उमेदवार आदिती तटकरे यांना बसणार आहे.

तळा तालुक्यातील प्रतिष्ठित असणाऱ्या काकडशेत ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या कळसांबडे गावाने येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.श्रीवर्धन मतदार संघात येणाऱ्या या गावाने येथील खा.सुनील तटकरे,मंत्री अदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे ग्रामपंचायत सरपंच यांच्याकडे प्रलंबित विकासकामे व सर्वसामान्यांच्या मूलभूत प्रश्नांवर अनेक निवेदन दिली, अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आला गावातील समस्यांबाबत सांगण्यात आले परंतु आश्वासनांच्या पलीकडे कोणतेही काम गेल्या सात ते आठ वर्षात झालेले नाही त्यामुळे नाईलाजाने ग्रामस्थांनी हा निर्णय घेतला असल्याचे या गावचे सचिव संतोष वाढवळ यांनी प्रस्तृत प्रतिनिधी जवळ बोलताना सांगितले.

खा.सुनील तटकरे साहेब,मंत्री अदिती तटकरे, आ.अनिकेतभाई तटकरे, ग्रामपंचायत सरपंच यांच्याकडे प्रलंबित विकासकामे व सर्वसामान्यांच्या मूलभूत प्रश्नांवर अनेक निवेदन दिली, अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आला गावातील समस्यांबाबत सांगण्यात आले परंतु आश्वासनांच्या पलीकडे कोणतेही काम गेल्या सात ते आठ वर्षात झालेले नाही त्यामुळे नाईलाजाने ग्रामस्थांनी हा निर्णय घेतला आहे.

# मतदानपूर्व आणि मतदान दिवशीच्या जाहिरातींना 'एमसीएमसी'चे प्रमाणिकरण बंधनकारक - जिल्हा निवडणूक अधिकारी एम.देवेंदर सिंह

**रत्नागिरी (आकांक्षा नार्वेकर)** - कोणताही राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या २० नोव्हेंबर २०२४ मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी म्हणजेच १९ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रिंट माध्यमांमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात, जोपर्यंत राज्य/जिल्हास्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून (एमसीएमसी) पूर्व-प्रमाणित केली जात नाही, तोपर्यंत वृत्तपत्रात प्रकाशित करु नये. भारत निवडणूक आयोगाच्या या निर्देशाचे काटेकोरपणे पालन व्हावे, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी एम.देवेंदर सिंह यांनी यांनी दिले आहेत.

भारत निवडणूक आयोगाच्या परिपत्रकानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या एक दिवसापूर्वी प्रिंट माध्यमांमधून कोणत्याही भडकाऊ, दिशाभूल करणाऱ्या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये. ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेला खिळ बसेल अशा जाहिराती प्रकाशित होऊ नयेत याबाबत दक्षता घेण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्यामुळे कोणताही राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या २० नोव्हेंबर २०२४ मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी म्हणजेच १९ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रिंट माध्यमांमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात, जोपर्यंत राज्य/जिल्हास्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून (एमसीएमसी) पूर्व-प्रमाणित केली जात नाही, तसेच राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांना सदर कालावधीत प्रिंट माध्यमांमध्ये राजकीय जाहिरात द्यावयाची झाल्यास, अर्जदारांनी जाहिरात प्रकाशित करण्याच्या प्रस्तावित तारखेच्या दोन दिवस आधी एमसीएमसी समितीकडे अर्ज करावा, अशा सूचनाही निवडणूक आयोगाने दिल्या आहेत.

SPORT

# Smriti Mandhana shines with stunning 25-ball 40 vs Melbourne Renegades in WBBL

**New Delhi** - Star India batter Smriti Mandhana produced a stunning show for Adelaide Strikers in Women's Big Bash League. Mandhana, in her 2nd outing for the Strikers, smashed a 25-ball 40 vs Melbourne Renegades at the Karen Rolton Oval in Adelaide on November 11, Monday.

The India opener received a warm welcome from the team as she made her debut for Adelaide Strikers vs Brisbane Heat. However, Mandhana failed to impress in her maiden outing for the Strikers as she scored just 6 runs and was dismissed by her India teammate and Brisbane Heat pacer Shikha Pandey.

"A big welcome and congratulations to Smriti Mandhana for making her debut with your Adelaide Strikers! A great cap presentation led by Megan Schutt and captain Tahlia Mcgrath. We cannot wait to see you in action!" the Adelaide Strikers wrote on X. She received her cap from Australian veterans Tahlia McGrath and Megan Schutt. The Strikers were excited to



welcome Mandhana into the team and see her perform well for the team.

Mandhana finally managed torepay the faithshowcased in her second outing itself. She played a stunning knock of 40 runs from just 25 balls. At a strike-rate of 160, she hit seven boundaries to provide a great start for her team. She shared a 56-run opening stand with Katie Mack within just 36 balls. Mandhana was the aggressor, hitting 36 runs in 18 balls. But after Katie's dismissal, she slowed down and managed only four runs in the next seven deliveries before getting dismissed off Sarah Coyte's delivery.

However, she provided a fiery start to the team and captain Tahlia McGrath cashed-in with a 24-ball 49 and Orla Prendergast provided the finishing touch by scoring 24 runs from just 12 balls. The Adelaide Strikers put up a challenging total of 185/8 against Melbourne Renegades as they aimed to win the match after losing in their last two outings.

# Confident of strong bounce-back against Telugu Titans: Assistant coach Upendra Singh

**New Delhi** - UP Yoddhas exhibited a commendable performance but conceded a narrow 35-33 defeat to U Mumba in their inaugural home fixture of Pro Kabaddi League Season 11 at the Noida Indoor Stadium on Sunday evening.

The match saw stellar performances from UP Yoddhas' raiders, notably Bharat Hooda's impressive Super 10, complemented by Shivam Choudhary's raiding efforts.

In a display of tactical superiority during the initial phase, UP Yoddhas executed a perfectly coordinated all out against U Mumba in the 14th minute. The defensive unit, under the astute leadership of stand-in captain Sumit, demonstrated exceptional coordination from the left corner position.



Commenting on the team's performance, Assistant Coach Upendra Singh said, "Our team showed great coordination in the first half, and the early all out demonstrated our strategic preparation. The way our raiders and defenders complemented each other was particularly encouraging."

However, assistant coach Upendra Singh acknowledged that small lapses in concentration in the latter stages of the match ultimately led to the loss. "While we had a strong start, those last one or two minutes proved crucial. In such tight situations, even a single point can make the difference between victory and defeat."

Reflecting on the defensive strategy, Coach Upendra Singh highlighted the tactical adjustments made during the game. "We made some changes to our defensive lineup, and while some of those worked in our favour, consistency is key. We need to execute our plans more consistently over the entire 40 minutes."

Looking ahead to the upcoming match against Telugu Titans, the Assistant Coach expressed confidence in his team's ability to bounce back. "We'll take the learnings from this match forward. The team is already focused on our next challenge against Telugu Titans.

We believe in our preparation process and expect to showcase a strong performance in the upcoming match."

The UP Yoddhas will face Telugu Titans in their next home game on Thursday, November 14, looking to bounce back and secure their first victory of the home leg.

# Ravichandran Ashwin shares photo with chess legend Viswanathan Anand

**New Delhi** - Ravichandran Ashwin shared a photo on Instagram on Sunday morning and wrote, "It was great to have a fanboy moment and an unforgettable flight journey with the legend Viswanathan Anand."

Earlier in July this year, Ashwin became a co-owner of a team in the Global Chess League. He is the co-owner of the American Gambits team, which is led by World No. 2 Grand Master Hikaru Nakamura. Anand, who has won five World Championship titles and became India's first Grandmaster in 1988, shared a special message welcoming the legendary cricketer to the chess world.

Anand had posted, "Congratulations Ashwin on the exciting new venture in the chess world! As someone who has outplayed the best players in cricket, I am sure you will bring the same competitive spirit to the Global Chess League with American Gambits. May your journey be as great as your cricket career! Best of luck in London!" Apart from being a smart cricketer on the field, Ashwin is also an avid chess player. During the 2022 IPL, he was spotted playing chess with one of his teammates on a flight during Rajasthan Royals' Mumbai to Kolkata trip.



Last month, the star all-rounder became the highest wicket-taker in ICC World Test Championship (WTC) history during the second Test against New Zealand at the Maharashtra Cricket Association (MCA) Stadium in Pune.

He picked up three wickets on the opening day of the Test and took his tally to 189 wickets in 39 matches in WTC history from 2019 to 2024, surpassing Australia's Nathan Lyon who had 187 wickets in 43 Tests.

Last month, the star all-rounder became the highest wicket-taker in ICC World Test Championship (WTC) history during the second Test against New Zealand at the Maharashtra Cricket Association (MCA) Stadium in Pune.

# Gautam Gambhir confirms Jasprit Bumrah as India captain if Rohit Sharma misses Perth Test

**New Delhi** - India head coach Gautam Gambhir has confirmed that pace spearhead Jasprit Bumrah will lead the national men's cricket team if regular skipper Rohit Sharma is unavailable for the first Test of the highly anticipated Border-Gavaskar Trophy against Australia.

The opening match is scheduled to begin on November 22 in Perth.

"Bumrah is vice-captain; if Rohit is not available, he is going to lead in Perth," Gambhir stated during a pre-departure press conference in Mumbai on Monday.

While Rohit Sharma is not currently with the squad, he has not been officially ruled out of the series opener.

Gambhir provided an update on Rohit's status, saying, "At the moment, there is no confirmation but we will let you know exactly what the situation will be. Hopefully, he's going to be available, but everything we're going to get to know at the start of the series."

Gambhir's announcement



highlights the team's contingency plans as they prepare to face Australia, with Bumrah ready to step into the leadership role if needed.

Following India's shambolic fall against New Zealand on home turf, the road to the WTC final has become a tricky affair.

With a 3-0 series whitewash, India needs to win the series by 4-0 to punch their ticket to feature in London for the WTC final for the third successive time.

After the conclusion series opener in Perth, the second Test, featuring the day-night format, will take place under lights at Adelaide Oval from December 6 to 10. Fans will then turn their attention to The Gabba in Brisbane for the third Test from December 14 to 18.

The traditional Boxing Day Test, scheduled from December 26 to 30 at Melbourne's iconic Melbourne Cricket Ground, will mark the series' penultimate stage.

The fifth and final Test will be held at the Sydney Cricket Ground from January 3 to 7, promising an exciting climax to a highly anticipated series.

India's squad for Border-Gavaskar Series: Rohit Sharma (c), Jasprit Bumrah (vc), Ravichandran Ashwin, Mohammad Shami, Abhimanyu Easwaran, Shubman Gill, Ravindra Jadeja, Yashasvi Jaiswal, Dhruv Jurel (wk), Sarfaraz Khan, Virat Kohli, Prasidh Krishna, Rishabh Pant (wk), KL Rahul, Harshit Rana, Nitish Kumar Reddy, Mohammed Siraj, Washington Sundar.

Australia squad for the first Test: Pat Cummins (c), Scott Boland, Alex Carey, Josh Hazlewood, Travis Head, Josh Inglis, Usman Khawaja, Marnus Labuschagne, Nathan Lyon, Mitch Marsh, Nathan McSweeney, Steve Smith, Mitchell Starc.

# न्यायाधीश संजीव खन्ना यांनी सरन्यायाधीश पदाची घेतली शपथ

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

न्यायाधीश संजीव खन्ना यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत भारताचे ५१वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. यावेळी कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी सरन्यायाधीश खन्ना यांचे अभिनंदन केले. शपथविधी सोहळ्याला माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड उपस्थित राहीले.

धनंजय चंद्रचूड हे सरन्यायाधीश पदावरून रविवारी निवृत्त झाले. त्यांची जागा न्यायाधीश संजीव खन्ना यांनी घेतली आहे. सरन्यायाधीश खन्ना यांचा सरन्यायाधीश म्हणून सहा महिन्यांचा म्हणजे १३ मे २०२५ पर्यंत कार्यकाळ राहणार आहे. केंद्र सरकारनं न्यायाधीश संजीव खन्ना यांची देशाचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यासाठी नुकतीच अधिसूचना जारी केली होती. कायदा आणि न्याय मंत्रालयाने अधिसूचनेत म्हटलं की, भारतीय राज्यघटनेच्या कलम १२४च्या कलम (२) अंतर्गत राष्ट्रपतींनी न्यायाधीश खन्ना यांची देशातील सर्वोच्च न्यायिक पदावर नियुक्ती केली आहे.



सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्याविषयी- १४ मे १९६० रोजी जन्मलेल्या सरन्यायाधीश खन्ना यांनी १९८३ मध्ये कायदे क्षेत्रातील कारकीर्दीला सुरुवात केली. खन्ना यांनी प्रथम दिल्ली बार काउन्सीलमध्ये वकिलीला सुरुवात केली. घटनात्मक कायदा, कर, लवाद, व्यावसायिक कायदा आणि पर्यावरण कायदा यासह कायदेशीर क्षेत्रात त्यांना मोठा अनुभव आहे. सरन्यायाधीश खन्ना यांनी प्राप्तिकर विभागाकरिता वकील म्हणूनही काम केले आहे. सरन्यायाधीश खन्ना हे दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश देव राज खन्ना यांचे पुत्र आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश एच.आर. खन्ना यांचा पुतणे आहेत.

न्यायाधीश म्हणून कार्यरत असताना खन्ना यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठानं दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अंतरिम जामीन मंजूर केला होता.

जम्मू काश्मीरचे कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाकडून कायम ठेवण्यात आला होता. या खंडपीठात न्यायाधीश खन्ना होते.

२०१८ च्या इलेक्टोरल बाँड योजनेवरून सरकारला फटकारण्यात आले होते. या खंडपीठातही न्यायाधीश खन्ना होते.

मावळते सरन्यायाधीश म्हणून धनंजय चंद्रचूड यांनी शुक्रवारी निरोपाच्या कार्यक्रमात भावूक भाषण केले. यावेळी त्यांनी रांगेत बसलेला कायद्याचा विद्यार्थी होण्यापासून ते सरन्यायाधीश होण्यापर्यंतचा प्रवास उलगडून सांगितला. त्यांनी न्यायाधीश संजीव खन्ना यांचे कौतुक केले. यावेळी धनंजय चंद्रचुड म्हणाले, " न्यायाधीश खन्ना हे खूप स्थिर आणि न्यायासाठी खूप वचनबद्ध आहेत. त्यामुळे आनंदाच्या भावनेनं मी न्यायालयातून बाहेर पडत आहे. सोमवारी येथे येऊन बसणारी व्यक्ती अत्यंत प्रतिष्ठित व्यक्ती आहे. ते व्यापक पातळीवर जागरूक आहेत."

यावेळी न्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले, "मला न्यायाधीश चंद्रचूड यांच्या न्यायालयात हजर राहण्याची संधी मिळाली नाही. परंतु त्यांनी केलेल्या कामाचा मला अभिमान आहे. पुढे न्यायाधीश खन्ना म्हणाले की, " सरन्यायाधीश चंद्रचूड यांना समोसे आवडतात. जवळपास प्रत्येक बैठकीत त्यांना समोसे दिले जातात". दरम्यान, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, "सरन्यायाधीशांची उणीव भासणार आहे. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल म्हणाले, "तुम्ही एका असामान्य वडिलांचे असामान्य पुत्र आहात. नेहमी हसतमुख असणारे डॉ. चंद्रचूड, तुमचा चेहरा सदैव आठवणीत राहील."

# लोहगावात साडेपाच हजार पोलिसांच्या घराचे स्वप्न लवकरच साकार

● पुणे, अभिजीत येरल्लू :

लोहगावात गेल्या बारा वर्षांपासून रखडलेल्या महाराष्ट्र पोलीस मेगा सिटी कॉर्पोरेशनचा (एमपीएमसी) गृहनिर्माण प्रकल्प साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या वर्षभरापासून केलेल्या पाठपुराव्यामुळे नेदरलँडमधील एका निमशासकीय संस्थेशी करार (टर्मशीट) करण्यात आला आहे. या संस्थेच्या माध्यमातून गृहनिर्माणासाठी ६०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने पोलिसांच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे.



कराराची कागदपत्रे एमपीएमसीकडे नुकतीच हस्तांतरित करण्यात आली आहे, अशी माहिती रुरल एन्हान्सर्स संस्थेचे प्रमुख, तसेच परदेशी गुंतवणुकीचे समन्वयक अंबर आयदे यांनी दिली. शनिवारी पार पडलेल्या एका कार्यक्रमात याबाबतची कागदपत्रे अटल कन्सल्टिंगचे प्रकल्प व्यवस्थापक अनिल कुमार कुप्पा यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आली. यावेळी अटल कन्सल्टिंग नेदरलँडचे व्यवस्थापकीय संचालक श्रीहान बाटले दूरदृश्य प्रणाली तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपस्थित होते. एमपीएमसीचे अध्यक्ष भरतकुमार राणे उपस्थित होते.

राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या ५२४८ घरांचा, तसेच १६० दुकानांचा प्रकल्प लोहगावमधील ११७ एकरांवर साकारण्यात येणार आहे. संबंधित प्रकल्प २०१२ पासून रखडला होता. पोलिसांच्या घरांसाठी देवेंद्र फडणवीस यांनी पाठपुरावा केला. राज्य शासनाचे एफडीआय प्रमुख आणि सहसचिव कौस्तुभ धावसे यांनी या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील वित्तीय पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून गुंतवणूक आणण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली होती. त्याअनुषंगाने ८ सप्टेंबर रोजी मुंबईत नेदरलँडस्थित संस्था आणि उपमुख्यमंत्री कार्यालयात बैठक आयेजित करण्यात आली. या बैठकीनंतर गुंतवणूक करण्याचे निश्चित झाले. त्यानिमित्ताने एक छोटेखानी सोहळा मुंबईत पार पडला, असे अंबर आयदे यांनी नमूद केले.

> ■ गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठपुराव्यामुळे लोहगावमधील पोलिसांच्या रखडलेल्या गृहनिर्माण प्रकल्पासाठी परदेशातील संस्थेकडून निधी उपलब्ध झाला. सर्व सदनिकाधारकांना मूळ किमतीत सदनिका कशी देता येईल, यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.
>
> **- भरतकुमार राणे, अध्यक्ष, महाराष्ट्र पोलीस मेगा कॉर्पोरेशन सिटी, लोहगाव, पुणे**

एमपीएमसी प्रकल्पाच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यांमध्ये जवळपास ५२४८ सदनिका आणि जवळपास १६० दुकानांचे हस्तांतरण करणे या प्रकल्पाचे विकसक बिलोमोरिया यांना बंधनकारक होते. काही कारणांमुळे तो रखडला. हक्काच्या घरासाठी पोलिसांनी पैसे भरले होते. काहींनी कर्ज काढले होते. करोना संसर्ग काळात काही जणांचा मृत्यू झाला. लोहगावमधील गृहनिर्माण प्रकल्प रखडल्याने पोलिसांना मनस्तापाला सामोरे जावे लागले.

# काँग्रेसच्या १६ बंडखोरांना ६ वर्षांसाठी पक्षातून निलंबित



● मुंबई, विशाल पाटील :

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसनं पक्षाच्या १६ बंडखोर उमेदवारांवर कारवाई केली. काँग्रेसनं रविवारी बंडखोरी करत विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या १६ उमेदवारांची ६ वर्षांसाठी पक्षातून हकालपट्टी केली. महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या सूचनेवरून पक्षानं बंडखोरांना निलंबित करण्याचा आदेश जारी केला आहे.

राज्यात एकाच टप्प्यात निवडणूक पार पडणार असून २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहेत. दरम्यान, आता काँग्रेसनं बंडखोरांविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. बंडखोरांवर कडक कारवाई केली जाईल, असं काँग्रेस पक्षानं नुकतंच जाहीर केलं होतं.

### बंडखोर उमेदवार

- आनंदराव गेडाम, शिलु चिमूरकर
- सोनल कोवे, भरत येरमे
- अभिलाषा गावतूरे, राजु झोडे
- प्रेमसागर गणवीर
- अजय लांजेवार
- विलास रघुनाथ पाटील,
- आसमा जव्वाद चिखलेकर
- हंसकुमार पांडे
- कमल व्यवहारे
- मोहनराव दांडेकर
- मंगल विलास भुजबळ
- मनोज शिंदे
- सुरेश पाटीलखेडे
- विजय खडसे
- शबीर खान
- अविनाश लाड
- याज्ञवल्क्य जिचकार
- राजेंद्र मुळक

# उष्मा वाढल्याने नेतेमंडळी घामाघुम

## उमेदवार, कार्यकर्त्यांना तापमानवाढीचा फटका

● अलिबाग, दिगंबर जाधव :

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून, अलिबागचे तापमान 33 अंश सेल्सियस इतके झाल्याने उमेदवार व कार्यकर्त्यांना उन्हाची झळ सोसताना दमछाक होऊ लागली आहे. पोलीस प्रशासनालाही बंदोबस्ताच्या वेळी उष्णतेचा सामना करावा लागत आहे. परतीचा पाऊस गेल्यावर हळहळू तापमानात वाढ सुरू झाली आहे. त्यामुळे उष्णतेचा दाह निर्माण झाला आहे.

रायगड जिल्ह्यात सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी पाहावयास मिळत आहे. उमेदवारी अर्ज , भरल्या नंतर घरोघरी प्रचार, नागरिकांच्या गाठीभेटी, जाहीर सभा, प्रचार रॅली असे वातावरण निर्माण झाले आहे; मात्र उष्णतेत वाढ होत असल्याने जे कार्यकर्ते उमेदवाराच्या प्रचारासाठी बाहेर पडत आहेत, त्यांना उकाड्याचा सामना करावा लागत आहे.

उन्हाचा चटका रायगड मधील अलिबाग,मुरुड पेण ,पनवेल,उरण,कर्जत, श्रीवधन,महाड, , अशा सात विधानसभा रायगड जिल्ह्यात आहेत. त्यात ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणात असून, गावोगावी फिरताना उन्हाचा चटका सहन करावा लागत आहे. शुक्रवार व शनीवारी 32 अंश सेल्सिअंश, तर सोमवारी 34 अंशावर तापमान आहे. त्यामुळे प्रचाराच्या मैदानात आणि उकाड्यात कार्यकर्ते व उमेदवार प्रचाराचे वेळापत्रक बदलण्याची वेळ आली आहे. सकाळी व सायंकाळी प्रचाराला अधिक वेग आला आहे..

पोलिसांना निवडणुकीदरम्यान बंदोबस्त असणार आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. त्यात तापमानात झालेली वाढ डोकेदुखी ठरत आहे.

**संसर्गजन्य आजारात वाढ**

उष्मा वाढल्याने अनेकांना आरोग्याच्या समस्या सतावत आहेत. त्यामुळे डोकेदुखी, चक्कर येणे आणि श्वासो श्वासाच्या व्याधी बळवल्या आहेत. उच्च आद्रतेमुळे शरीरचे तापमान अनियंत्रित होत असल्याने दम्यासारखे आजार वाढत आहेत .वाढत्या तापमानामुळे रोग प्रतिकारशक्ती कमी होत असल्याने सर्दी खोकल्यासारखे संसर्गजन्य आजार बळावत आहेत.

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ प्रसार माध्यम कक्ष, १३६ भिवंडी (पश्चिम)**

# १३६ भिवंडी पश्चिम मतदार संघात मतदान यंत्रे (EVM मशिन) Sealing च्या कामला सुरुवात

● भिवंडी, सम्यक कासारे :

१३६ भिवंडी (पश्चिम) विधानसभा मतदार संघ मध्यवर्ती निवडणूक कार्यालयात मतदान यंत्रे (EVM मशिन) सिलीगच्या कामाला आज दि. ११/११/२०२४ रोजी येथे मा. निवडणूक निर्णय अधिकारी श्री. उदय किसवे यांचे पर्यवेक्षणाखाली सुरूवात करण्यात आली.





१३६ भिवंडी (पश्चिम) विधानसभा मतदार संघात एकुण ३०३ मतदान केंद्र असुन प्रत्येक मतदान केंद्र निहाय १ मशिन आणि मतदान केंद्राच्या २०% राखीव या प्रमाणात अतिरिक्त मशीन असे एकुण BU-३६३, CU-३६३ व VVPAT-३९३ मतदान यंत्रांची सिलींगची कार्यवाही सुरु करण्यात आली. याकामी ४५ टेबल मांडण्यात आले असुन १३५ कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, एकुण ३६३ मतदान यंत्रांच्या ५% या प्रमाणात एकुण १८ मतदान यंत्रे मॉकपोलसाठी सुनिश्चित करण्यात आली. ही यंत्रे निश्चित करतांना मा. निवडणूक निर्णय अधिकारी श्री. उदय किसवे यांनी चिठ्या टाकल्या, तर उमेदवार/उमेदवारांचे प्रतिनीधी यांनी चिठ्या उचलुन ही १८ मतदान यंत्रे निश्चीत केली. सिलींग व मॉकपोल नंतर ही यंत्रे १३६ भिवंडी (पश्चिम) विधानसभा मतदार संघ मध्यवर्ती निवडणूक कार्यालयातील स्ट्रॉगरुम येथे सुरक्षीतरित्या ठेवण्यात येतील.

उमेदवार/उमेदवारांचे प्रतिनीधी यांचे समक्ष संपूर्ण सिलींगची व मॉकपोलची प्रक्रीया सुरु असून यामध्ये पुर्णतः पारदर्शकता राखली जात असल्याचे प्रतिपादन मा. निवडणूक निर्णय अधिकारी श्री. उदय किसवे यांनी केले. या प्रसंगी मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांचेसोबत सहा. निवडणूक निर्णय अधिकारी श्री. अभिजीत खोले व श्री. विशाल इंदुलकर, निवासी नायब तहसिलदार हे उपस्थीत होते.

# अयोध्येवरून काशीला जाणाऱ्या बसला ट्रकची धडक, अपघातात महाराष्ट्राचे ४५ भाविक जखमी

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

धार्मिक पर्यटनाकरिता उत्तर प्रदेशमध्ये गेलेल्या महाराष्ट्रातील भाविकांच्या बसचा भीषणम अपघात झाला. अयोध्येहून काशीला घेऊन जाणारी भाविकांची बस रविवारी रात्री वाराणसी-लखनौ महामार्गावर सफरचंदांनी भरलेल्या ट्रकला धडकली. या अपघातात ४५ जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

बसमधील जखमी झालेल्या भाविकांवर ) लंबुआ येथील आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत. अपघातात नऊ गंभीर जखमी आहेत. त्यांच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्रातील भाविक हे अयोध्येहून काशीच्या दिशेने बसनं जात होते. ही बस






लंबुआ कोतवाली परिसरातील बायपासवर असलेल्या कब्रस्तानजीक रविवारी रात्री एक वाजण्याच्या सुमारास पोहोचली. त्यावेळी विरुद्ध दिशेकडून सफरचंद घेऊन जाणाऱ्या ट्रकला भाविकांच्या बसची जोरदार धडक बसली. अपघातानंतर घाबरलेल्या आणि जखमी झालेल्या प्रवाशांनी मदतीसाठी आरडाओरडा केला. यावेळी स्थानिक लोकांच्या अपघातस्थळी धाव घेतली. अपघातस्थळी रुग्णवाहिका आणि पोलीस घटनास्थळी पोहोचले. जखमी प्रवाशांना सीएचसी लंबुआ येथी आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथून गंभीर जखमी झालेल्या नऊ जणांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्यात आले.

तहसीलदार देवानंद तिवारी, क्षेत्र अधिकारी अब्दुस सलाम यांनीही अपघातस्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला.

# ३५वी जिल्हास्तरीय व अंतर्गत शरीरसौष्ठव ‘श्री मावळीमंडळ श्री’ स्पर्धा उत्साहात साजरी




● ठाणे, रोहित जैसवार :

श्री मावळी मंडळ ठाणे संस्थेने शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित ३५वी जिल्हास्तरीय व अंतर्गत शरीरसौष्ठव श्री मावळी मंडळ श्री स्पर्धा शनिवार दिनांक ९ नोव्हेंबर २०२४ रोजी संस्थेच्या क्रीडांगणात मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेमध्ये अंतर्गत व जिल्हास्तरीय मिळून एकूण १४ व ४९ अशा ६३ स्पर्धकांनी भाग घेतला होता. ह्या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष सुधाकर मोरे यांनी केले. अंतर्गत व जिल्हास्तरीय किताब विजेत्यांना बक्षिस देण्यासाठी प्रमुख पाहुणे अशोक उतेकर (कळवा पोलीस स्टेशन प्रमुख), विशेष अतिथी कमलाकर पाटील (अध्यक्ष अखिल भारतीय शरीरसौष्ठव संघटना), अमित नांदगावकर (अध्यक्ष - ठाणे जिल्हा शरीर सौष्ठव संघटना) व कौस्तुभ कुलकर्णी (न्यू इंडिया इन्शुरन्स ठाणे विभाग जिल्हा प्रमुख) हे उपस्थित होते. त्यांच्याबरोबर संस्थेचे अध्यक्ष सुधाकर मोरे, उपाध्यक्ष सुनील करंजकर, खजिनदार रिक्सन फर्नांडिस, चिटणीस रमण गोरे, उप चिटणीस संतोष सुर्वे, सहचिटणीस चिंतामणी पाटील, विश्वस्त कृष्णा डोंगरे, विश्वस्त प्रभाकर सुर्वे, विश्वस्त पॅट्रिक फर्नांडीस व विश्वस्त केशव मुकणे हे उपस्थित होते.

सदर स्पर्धेत अंतर्गत श्री मावळी मंडळ श्री किताब किशोर सीताराम जाधव याने पटकविला. तर, जिल्हास्तरीय श्री मावळी मंडळ श्री किताब ए बी एस स्टुडिओ जिम ठाणे या व्यायाम शाळेच्या करण श्रवण ठाकूर याने पटकविला.